रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I वर्ष ८७ I अंक ३४९ I पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

हातमाग व यंत्रमाग कापडाचे भव्य प्रदर्शन व विक्री
20% सूट लग्नसराई निमित्त स्पेशल ऑफर
आयोजक भाऊराया हॅन्डलुम, सोलापूर.
दि.६ मे ते ३१ मे पर्यंत स. १० ते रात्री ९ पर्यंत
सुप्रसिद्ध सोलापूरातील कॉटन इरकली साडी, धारवाड साडी, पटोला साडी, मदुराई कॉटन साडी, परकर, टॉप पीस, सोलापूर चादर, बेडशीट, नॅपकिन, सतरंजी, पंचा, टॉवेल, दिवाणसेट, पिलो कव्हर, लुंगी शर्ट, कुर्ता, बंडी व असंख्य व्हरायटी
स्थळ - सार्वजनिक वाचनालय डोंगरे हॉल, रायगड जिल्हा परिषद जवळ मुख्य पोस्ट ऑफीस समोर, अलिबाग

रायगड, रविवार, दि. २६ मे २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

अलिबाग-नागाव रोडटच आमराई विकणे आहे
१५.५ गुंठे, क्लियर टायटल, फ्रेश, हमरस्त्याला लागून सिटी सर्वे, संपूर्ण तार कंपाऊंड गेट, २४ X ७ सीसीटीव्ही कॅमेरा निरीक्षण, प्रिमियम लोकेशन, एस.टी. स्टॉपला लागून, नळ, इलेक्ट्रीसिटी पोल जवळच, Direct Party, एजंट सुद्धा चालेल.
संपर्क - ९७६९१०८१७०

# डोक्यावरचा हंडा उतरणार कधी?

**। अलिबाग। विशेष प्रतिनिधी।**

**पाणीटंचाईच्या झळा बसू नये, याकरिता प्रशासनाने अनेक उपाय केले. मात्र,० तरीही रायगड जिल्ह्यातील ५६ गावे व २४४ वाड्यांना पाणीटंचाईच्या झळा बसू लागल्याने हंडाभर पाण्यासाठी दोन मैल जीवघेणी डोंगरकपारीतील खडतर पायपीट महिलांना करावी लागत आहे. गेली कित्येक वर्षे प्रशासनाला हा प्रश्न सोडविण्यात यश आलेले नाही. परिणामी, आमच्या डोक्यावरचा हंडा अजून किती वर्षांनी उतरेल, असा संतप्त सवाल महिलांनी उपस्थित केला आहे.**

पाणी म्हणजेच जीवन आहे याचा जीवघेणा प्रत्यय टंचाईग्रस्त आदिवासीवाडीवर गेल्याशिवाय कळत नाही. हंडाभर पाण्यासाठी दररोज मरणयातना सहन करण्याचे दुर्भाग्यच त्यांच्या नशिबी आले आहे. ग्रामीण भागातील महिलांना पहाटेपासूनच पाण्याच्या शोधार्थ पायपीट करावी लागत आहे. डोक्यावर पाण्याने भरलेला हंडा घेऊन चालताना फार त्रास होतो. हंडाभर पाण्याचे मोल किती आहे, हे त्यांच्या तोंडून ऐकायला मिळते.

प्रत्येक वर्षी उन्हाळा सुरु झाला की, पाणीप्रश्न तोंड वर काढतो. त्यात महिला आणि लहान बालके यांच्या डोक्यावर हंडे-घागरी, सायकलीला अडकवलेली कॅंड-घागरी, हातगाड्यांवर पाण्याच्या टाक्या, घागरी व इतर माध्यमातून पाणी मिळवण्यासाठी त्यांची धावपळ दिसून येते. हे चित्र प्रत्येक उन्हाळ्यात कमी-अधिक फरकाने दिसते. अलीकडे काही पुरुषमंडळी घरातील महिलांबरोबर पाणी भरण्याच्या मदतीसाठी येत असल्याचे दिसतात. यावर्षीदेखील अनेक ठिकाणी टंचाईग्रस्त गावांना ४५ शासकीय टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

| २०२४ | २०२३ |
|---|---|
| ५६ गावे | ४८ गावे |
| २४४ वाड्या | १५८ वाड्या |
| ४५ टँकर | २९ टँकर |

प्रशासनाने अनेक उपाय करुनही गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी पाणीटंचाईचा फटका जास्त गाव-वाड्यांना बसला असल्याची धक्कादायक बाब आकडेवारीतून समोर आली आहे. गतवर्षी याच दिवशी ४८ गावे व १५८ वाड्यांना •> पान २ वर

## लक्ष्मीनगर परिसरात दोन किलोमीटर पायपीट

**रोहा तालुक्यातील भातसई, लक्ष्मीनगर, झोळांबे अशा अनेक गावांमध्ये पाण्याचा दुष्काळ आहे. पंधरा-पंधरा दिवस गावांमध्ये पाणी येत नाही. त्यामुळे येथील ग्रामस्थांना दोन-दोन किलोमीटर पायपीट करीत पाण्याची वाहतूक करावी लागत आहे. गावांतील शाळकरी मुलांना उन्हाळी सुट्टी पाणी भरण्यासाठी घालवावी लागत आहे. अनेक वेळा भरदुपारी उन्हात पाणी भरण्याची वेळ महिलांवर येत आहे. काहीजण डोक्यावर हंडे घेऊन, तर काहीजण मोठ मोठे पाण्याचे ड्रम भरून दुचाकीवरून पाण्याची वाहतूक करीत आहेत. या भागात पाण्याची समस्या कायमच निर्माण होत आहे. ती सोडविण्यास प्रशासन उदासीन ठरत आहे. वेगवेगळ्या पाण्याच्या योजना राबवूनदेखील पाणी मिळत नसल्याने महिलावर्गात संताप निर्माण झाला आहे.**



## वेधक

### मलय मेहतांना २९ मेपर्यंत कोठडी

**डोंबिवली :** अमुदान केमिकल स्फोटप्रकरणी संचालक मलय मेहतांना २९ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. डोंबिवली एमआयडीसीमध्ये गुरुवारी भीषण स्फोट झाला होता. यामध्ये आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला आहे. स्फोटातील मुख्य आरोपी मलय प्रदीप मेहतांना (३८) ठाणे गुन्हे शाखेच्या पथकानं ठाण्यातून अटक करून शनिवारी कल्याण जिल्हा सत्र न्यायालयात हजर केलं होतं. यावेळी न्यायालयानं त्यांना २९ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तर, त्यांच्या आई मालती मेहता (७०) नाशिकला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार नाशिक क्राईम ब्रांच युनिट एक तसंच ठाणे क्राईम ब्रांच पोलिसांनी संयुक्त कारवाई करत त्यांना ताब्यात घेतलं. तर शुक्रवारीच बॉयलर स्फोटप्रकरणी मालती मेहता, त्यांचा मुलगा मलय मेहतांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा मानपाडा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

### मेधा पाटकर दोषी

**नवी दिल्ली :** सामाजिक कार्यकर्त्या आणि नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांना २४ वर्षांपूर्वीच्या खटल्यात दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. दिल्लीतील एका न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. त्याविरोधात जिल्हा न्यायालयात धाव घेणार असल्याचं मेधा पाटकर यांच्या सहकारी प्रतिभा शिंदे यांनी सांगितलं आहे. दिल्लीचे उपराज्यपाल व्ही.के. सक्सेना यांनी मेधा पाटकर यांच्यावर खोटे आरोप, उपहासात्मक वक्तव्ये आणि बदनामी केल्याचा आरोप करत त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. या मानहानीच्या खटल्यात दिल्लीच्या साकेत कोर्टाने मेधा पाटकर यांना शुक्रवारी दोषी ठरवले होते. त्यानंतर मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट राघव शर्मा यांनी मेधा पाटकर यांना या प्रकरणात दोन वर्षांची शिक्षा सुनावली आहे.

## सोमवारी दहावीचा निकाल

### विद्यार्थ्यांसह पालकांची धाकधूक वाढली

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल येत्या सोमवारी (दि. २७) दुपारी एक वाजता ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी दिली आहे. त्यामुळे निकालाच्या प्रतिक्षेत असणाऱ्या विद्यार्थ्यांसह पालकांची धाकधूक चांगलीच वाढली आहे.

महाराष्ट्र बोर्डाकडून बारावीचा निकाल २१ मे रोजी जाहीर करण्यात आला होता. त्यानंतर दहावीचा निकालाची विद्यार्थी आणि पालकांना प्रतीक्षा लागून राहिली होती. दरम्यान, राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत मार्च •> पान २ वर


## वेळेआधीच जंजिरा कुलूपबंद

### पर्यटकांची घोर निराशा शेकडो वाहने माघारी

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

निर्धारित वेळेआधीच जंजिरा किल्ला शुक्रवारी २४ मे रोजी सकाळी ११ वाजल्यापासून वादळी वातावरणामुळेसुरक्षेच्याकारणास्तव पर्यटकांसाठी बंद करण्यात आला. परिणामी, राज्यभरातून आलेल्या अनेक पर्यटकांची घोर निराशा झाल्याचे दिसून आले. जंजिरा बंद समजल्याने मुरूड, रोहा, दिघी, श्रीवर्धन, पुणे, अलिबाग, मुंबईकडून आलेली पर्यटकांची सुमारे ६०० वाहने माघारी वळविण्यात आल्याचे दिसून आले

शासकीय आदेशाप्रमाणे २६ मेपासून जंजिराचे दरवाजे पर्यटकांसाठी बंद करण्यात येणार होते. मात्र, गुरुवारपासून वादळी वातावरणामुळे समुद्रात लाटा उसळू लागल्याने पर्यटकांच्या सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मेरिटाइम बोर्डाचे खोरा बंदर निरीक्षक प्रमोद



राऊळ आणि पुरातत्व विभागाचे अधिकारी बजरंग येलीकर यांनी दिली. शनिवारी दुपारी खोरा बंदर जेट्टीवर भेट दिली असता असंख्य पर्यटक सकाळपासून जंजिरा पाहण्यासाठी दाखल झाल्याचं स्टॉल्सधारकांनी सांगितले. परंतु, समुद्रात जंजिऱ्यावर उसळणाऱ्या लाटांचे तांडव पाहून पर्यटकांना धडकी भरल्याने शांत राहणेच पसंद केले. मुरूडच्या आर्थिक पर्यटन विकासात जंजिरा •> पान २ वर

## माथेरान गजबजले

**माथेरान :** उष्णतेच्या लाटांमधून सुटका करून घेण्यासाठी अनेक पर्यटकांची पावले माथेरान पर्यटनस्थळाकडे वळली आहेत. महिन्यातील शेवटच्या विकेंडची सुट्टी सार्थकी लावण्यासाठी मुंबई, पुणे, गुजरातचे पर्यटक माथेरान पर्यटनस्थळी दाखल झाले असून, प्रदूषणमुक्त असे हे निसर्गरम्य, हिरवाईने नटलेले पर्यटनस्थळ पर्यटकांनी गजबजून गेले आहे. एकीकडे उन्हाचा तडाखा वाढत असताना शाळेला सुट्ट्या लागल्या आहेत. त्यामुळे पर्यटक थंड हवेच्या ठिकाणी जाणे पसंत करतात. मुंबई-पुण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेले सुप्रसिद्ध प्रदूषणमुक्त असे थंड हवेचे ठिकाण म्हणून माथेरानला अधिक पसंती मिळते. या मे •> पान २ वर

# मतदान टप्प्यांचा षटकार पूर्ण

### सहा राज्ये, दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये ५८ जागांसाठी ८८९ उमेदवार मैदानात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

देशभरातील लोकसभा निवडणुकीच्या पाच टप्प्यांचे मतदान यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर सहावा टप्पा शनिवारी (दि. २५) पार पडला. या टप्प्यात सहा राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदान झाले. दरम्यान, ५८ जागांसाठी ८८९



उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. सायंकाळी पाच वाजेपर्यंत पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक ७७.९९ टक्के, तर जम्मू-काश्मीरमध्ये सर्वात कमी ५१.३५ टक्के मतदान झाले. सहाव्या टप्प्यात सर्वाधिक २२३ उमेदवार हे हरियाणातील, तर २० उमेदवार जम्मू-काश्मीरच्या अनंतनाग •> पान २ वर

### पाच टप्प्यात किती मतदान

पहिल्या टप्प्यात ६६.१४ टक्के, दुसऱ्या टप्प्यात ६६.७१ टक्के आणि तिसऱ्या टप्प्यात ६५.६८ टक्के मतदान झालं. निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात सर्वात कमी ६२.२ टक्के मतदान झालं. तर चौथ्या टप्प्यात सर्वाधिक ६९.१६ टक्के मतदान झालं. तसंच शेवटच्या आणि सातव्या टप्प्यातील मतदान १ जून रोजी होणार आहे.

**संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ५७ टक्के मतदान**

| बिहार | हरियाणा | जम्मू आणि काश्मीर | झारखंड | दिल्ली | ओडिशा | उत्तर प्रदेश | पश्चिम बंगाल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 52.24 टक्के | 55.93 टक्के | 51.35 टक्के | 61.41 टक्के | 53.73 टक्के | 59.60 टक्के | 52.02 टक्के | 77.99 टक्के |

## कारवाईविरोधात होर्डिंग मालक न्यायालयात

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेनंतर राज्य शासनाने अनधिकृत होर्डिंग काढण्याचे आदेश दिले आहेत. शासनाच्या या आदेशाचा संदर्भ घेऊन सिडको प्रशासनाकडून पनवेल परिसरातील होर्डिंगविरोधात कारवाईला सुरुवात करण्यात आल्याने परिसरातील होर्डिंग मालकांनी कोर्टात याचिका दाखल केली आहे. सोमवारी (ता.२७) या याचिकेवर सुनावणी केली जाणार असल्याची माहिती याचिकाकर्त्यांनी दिली असून, याचिकेवर सुनावणी होईपर्यंत कारवाईवर स्थगिती देण्यात आली आहे. •> पान २ वर

### आदेशाला आव्हान


होर्डिंग्ज तात्काळ काढा, अन्यथा प्रशासनाकडून हे होर्डिंग्ज काढले जातील. होर्डिंग्ज काढण्याचा खर्च कंपनीकडून घेतला जाईल, असा इशारा सिडकोने कंपनीला दिला आहे. सिडकोच्या या आदेशाला याचिकेत आव्हान देण्यात आले आहे.

### गावकऱ्यांना मिळतोय रोजगार

गावकऱ्यांच्या जमिनीत हे होर्डिंग्ज कंपनीने उभे केले आहेत. गावकऱ्यांना जागेचे रीतसर भाडे दिले जाते. यातील एक गावकरी अपंग आहे. भाड्याच्या पैशातून त्याला औषधे घेता येतात. घरखर्च करता येतो. ग्रामपंचायतची परवानगी घेऊन हे होर्डिंग्ज लावले आहेत. होर्डिंग्जची वेळोवेळी तपासणी केली जाते, असा दावा याचिकेत करण्यात आला आहे.

आयुर्वेदिक 'खो-गो' ®
60 YEARS OF TRUST
६० वर्षे गुणवत्ता आणि विश्वासाची!
६० वर्षांपासून खोकल्यावर गुणकारी 'खो-गो' गोळ्या आणि कफ सिरप
कोरडा खोकला
कफयुक्त खोकला
घशातील खवखव
घसा दुखणे
ह्यावर गुणकारी
फक्त ₹10/-
सर्व केमिस्टमध्ये उपलब्ध
'खो-गो' हाच संपूर्ण आयुर्वेदिक उपाय कफ, खोकला यांवर अत्यंत गुणकारी पर्याय!
कफ सुटून घशाला त्वरीत आराम मिळतो.
TRADE MARK
अहिल्या आयुर्वेदिक औषधालय, मुंबई ६३.
+91 8108130009 • www.khogo.in

HOTEL MAPLE IVY
Let's Party!
Celebrate your special day in style at our banquet.
For more details Contact us at
7722089219 / 8149089217



कृषीवल
७ जून
८८ वर्षे
विश्वासाची
बांधिलकीची
चळवळीची
संघर्षाची
-: सहप्रायोजक :-
SAMIRA HABITATS
hiranandani communities
a niranjan hiranandani initiative
आरडीसीसी बँक
सहप्रवास प्रगतीचा
HOTEL MAPLE IVY
वर्धापन दिनानिमित्त 'भव्य फॅशन शो'
मिस कृषीवल
मिसेस कृषीवल
सौंदर्य स्पर्धेचे आयोजन
आजच नोंदणी करा
शेवटची तारीख २६ मे
स्थळ : क्षात्रैक्य समाज हॉल, कुरुळ, अलिबाग
स्पर्धकांनी नाव नोंदणी करण्यासाठी या क्रमांकावर संपर्क साधावा.
जयेश पाटील ९७६७०१११३९
अंकित गायकवाड ८९८३५२२५८१
विवेक ओव्हाळ ८९८३५४१४८७
ऑडिशन्स : २९ मे २०२४, वेळ : सकाळी ११ वाजता
स्थळ : मॅपल आयव्ही हॉटेल हॉल, अलिबाग

# मुरुडकरांचा प्रवास भंगार बसेसमधून?

## ■ एमएसआरटीसी करतेय प्रवाशांच्या जीवाशी खेळ; माहितीच्या अधिकारात माहिती उघड

**। कोर्लई । वार्ताहर ।**

**भंगार झालेल्या बसेसमधून मुरुडकरांचा प्रवास सुरू असून, एमएसआरटीसीकडून प्रवाशांच्या जीवाशी खेळ करीत आहे. मुरुड आगारातील सर्वच बसेस दहा वर्षांच्या वरील असल्याचा धक्कादायक प्रकार माहिती अधिकारात उघड झाला आहे, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते समीर रांजणकर यांनी दिली.**



मुरुड आगारात सद्यःस्थितीत ३३ बसेस कार्यरत आहेत. या बसेसचे आयुष्यमान संपत आलेले आहे. सर्व बसेस दहा वर्षांवरील, तर काही बसेस १४ वर्षांपर्यंतच्या आहेत. या बसेसना मुंबईमध्ये प्रवासास बंदी असूनदेखील मुरुड आगारातून त्या मुंबईसाठी सोडल्या जातात. या बसेस वारंवार ठिकठिकाणी रस्त्यामध्ये बंद पडत असतात, काही वेळा शहरातच बंद पडतात, तरी काही बसेसना आगसुद्धा लागलेली आहे.

अशा या भंगारात निघालेल्या बसेस मुरुड-मुंबई प्रवासासाठी सोडल्या जातात. सदर परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वारंवार समीर रांजणकर यांनी मुरुड आगाराशी संपर्क साधला. तिथेच न थांबताना पेण विभाग नियंत्रक यांच्याशी संपर्क साधला आणि मुरुडसाठी नवीन बसेसची मागणीसुद्धा केली होती. दहा-बारा बसेस मुरुडसाठी नवीन येणारसुद्धा होत्या. दरम्यान, तीन नवीन बसेस मिळाल्या होत्या, परंतु त्यातील दोन बसेस अचानक अलिबाग आगाराला देण्यात आल्या, त्यामुळे मुरुडसाठी फक्त एकच नवीन बस उपलब्ध आहे.

मुंबईमध्ये जाण्यासाठी किती वर्षांच्या बसेसना परवानगी आहे, या संदर्भात माहिती अधिकारात माहिती मागविली असताना रायगड विभाग नियंत्रक पेण यांनी माहिती दिली की, मुंबईमध्ये आठ वर्षांच्या आतील बसेसना परवानगी आहे. तरीसुद्धा मुरुड आगारातील दहा वर्षांवरील बसेस रोजचा मुरुड-मुंबई प्रवास करीत आहेत. दोन तर बसेस १४ वर्षे पूर्ण झालेल्या आहेत. या बसेस मुरुड-बोरवली, मुरूड-मुंबई प्रवासासाठी वापरल्या जातात. या बसेसमधून मुरुडचे प्रवासी जीव मुठीत घेऊन रोजच प्रवास करत आहेत. मुरुड आगाराची परिस्थिती खूप चिंताजनक आहे.

# मोदी तलावाच्या स्वच्छतेची मागणी

**। तळा । वार्ताहर ।**



तळा शहरातील मोदी तलावाची गाळ काढून स्वच्छता करण्याची मागणी शहरवासियांकडून केली जात आहे. शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या तलावाची सध्या दयनीय अवस्था झाली आहे. तलावात मोठ्या प्रमाणावर गाळ जमा झाला असून, आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांच्या घराचे सांडपाणी थेट तलावात सोडण्यात आले असल्याने तलावातील पाण्याचा उग्र वास येत असतो.

शहरातील संत रोहिदास नगर, बाजारपेठ, परीट आळी, सुतार आळी आदी गावांतील घरगुती गणपतींचे विसर्जन या तलावात केले जात असल्याने दरवर्षी विसर्जनासाठी आलेल्या भाविकांना या उग्र वासाचा त्रास सहन करावा लागतो. तसेच दुर्गंधीयुक्त दूषित पाण्यात विसर्जनासाठी उतरलेल्या गणेशभक्तांना यामुळे त्वचेचे विकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सध्या कडक उन्हाळ्याचे दिवस असल्याने या तलावातील पाण्याची पातळी बहुतांश कमी झाली आहे. त्यामुळे नगरपंचायत प्रशासनाने पावसाळ्यापूर्वीच मोदी तलावातील गाळ काढून पूर्णतः तलावाची स्वच्छता करावी जेणेकरून गणेशोत्सव काळात भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास सहन करावा लागणार नाही, अशी मागणी शहरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे. याबाबत तात्काळ निर्णय घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# हळदीच्या मांडवात रंगले कविसंमेलन

**। उरण । वार्ताहर ।**



पेण तालुक्यातील कळवा येथे पूजा पाटील या निराधार मुलीचे लग्न पेण कोमसापचे अध्यक्ष लवेंद्र मोकल यांनी वरेडी गावच्या चि. राहुल पाटील यांच्यासोबत लग्न लावून देताना आदल्या दिवशी हळदीच्या मांडवाला कविसंमेलन आयोजित करून नवा पायंडा घातला, असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष रायगड भूषण प्रा. एल.बी. पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात मांडले.

यावेळी कोमसापकडून श्री.-सौ. कलावती लवेंद्र मोकल आणि बेलवस्कर कुटुंबियांनी रेखा हिचा सांभाळ करून लग्न केल्याबद्दल सत्कार केला.यावेळी धवलारीण कवयित्री सविता पाटील, मीनल माळी यांनी सुरेल आवाजात धवले गायिले. कविसंमेलनात के. पी. पाटील, मोहनलाल पाटील, चंद्रकांत पाटील, सदानंद ठाकूर, रामचंद्र पाटील, गजानन म्हात्रे, गणपत पाटील, अशोक मोकल, व्हि.डी. पाटील, प्रकाश ठाकूर, मोहन पाटील, देविदास पाटील, हरिश्चंद्र माळी, जी.एच. ठाकूर इत्यादी ३१ कवींनी कवितांचं गायन आणि वाचन केले. उपस्थित मान्यवरांनी दारू नसलेल्या आगरी मांडवाचा आयुष्यात अनोखा आणि अगदी वेगळा आनंद मिळाल्याच्या भावना व्यक्त केल्या.

# विहिरीत पडून वृद्धेचा मृत्यू

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील एका ७५ वर्षीय वयोवृद्ध महिलेचा विहिरीत पडून मृत्यू झाला. सुलोचना पाटील असे या महिलेचे नाव असून, ही घटना शनिवारी दुपारी घडली. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दुपारी एका विहिरीमध्ये कोणीतरी पडल्याचा आवाज आला. घरात आणि परिसरात असलेल्या ग्रामस्थ महिलांच्या ही बाब लक्षात आली. सर्वांनी विहिरीकडे धाव घेतली. त्यावेळी ती महिला पाण्यात पडल्याचे दिसून आले. तिला तात्काळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, ती बेशुद्ध अवस्थेत होती.तिला तातडीने जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासले असता मृत घोषित केले.

# वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचा खोळंबा



**■ आंबेवाडी नाका येथे चौपदरीकरणाचे काम अद्याप अपूर्णच**

**■ तीन तास वाहनांच्या लांबच लांब रांगा**

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पुईपासून आंबेवाडी नाका येथे चौपदरीकरणाचे काम अद्यापही अपूर्ण असल्यामुळे येथे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. यामुळे तीन ते चार तास वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. परिणामी, प्रवाशांचा खोळंबा होताना दिसत आहे.

सध्या वातावरणात प्रचंड गर्मी जाणवत असून, अंगाचा दाह कमी करण्यासाठी मुंबई, ठाणे, पुणे येथील चाकरमानी कोकणात हरिहरेश्वर, श्रीवर्धन, दिघी, रत्नागिरी तसेच गोवा येथील समुद्रकिनारी गर्दी करीत आहेत. याशिवाय शनिवार, दि.२५ ते रविवार, दि २५ मे रोजी असणाऱ्या सुट्ट्या व शाळा-कॉलेज यांना पडलेल्या उन्हाळी सुट्ट्यांमुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहनाची संख्या अधिक वाढली आहे. यात भरीत भर आंबेवाडी नाक्यावरील काही दिवसांपूर्वी सुरु केलेल्या उड्डाणपुलाच्या कामामुळे पुई गावाच्या हद्दीपासून दोन किलोमीटर अंतरावर आंबेवाडी नाक्यापर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, यामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. भरउन्हाच्या झळा सहन करीत प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागत आहे.

आंबेवाडी बाजारपेठेतील चौपदरीकरणाचे काम तसेच उड्डाण पुलाचे काम पंधरा वर्षांनंतर सुरु केले आहे. यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. किती ठेकेदार आले नि किती गेले? रस्त्याचे काम काय मार्गी लागत नाही. महामार्ग पूर्ण होण्यासाठी लोकनेत्यांकडून फक्त तारीख पे तारीख; परंतु महामार्गाच्या कामात कोणतेही प्रगती नाही. काही दिवसांपूर्वी हे काम जूनपर्यंत पूर्ण होईल, असे लोकनेत्याकडून सांगण्यात आले. यामध्ये ठेकेदारावर प्रशासनाचा नसलेल्या वचक यामुळे फक्त मनमानी सुरु आहे. 'रोज मरे त्याला कोण रडे' अशीच परिस्थिती असून, या वाहतूक कोंडीमुळे तीन चार थांबून कोणाचा तरी नाहक बळी गेला तर याला जबाबदार कोण, असा प्रश्न प्रवाशांकडून केला जात आहे.

# सेक्सटॉर्शनचा फंडा वापरुन लाखोंचा गंडा

## पनवेलमध्ये आत्महत्येच्या प्रमाणात वाढ

**। पनवेल । वार्ताहर ।**

आजच्या तरुण पिढीला गंडा घालण्यासाठी सायबर गुन्हेगारांकडून अनेक युक्त्या वापरल्या जातात. सध्या 'सेक्सटॉर्शन'चा नवा फंडा वापरून अनेक गरिबांनादेखील लाखोंचा गंडा घालण्याचा सपाटाच सायबर गुन्हेगारांनी सुरू केला आहे. समाजातील इभ्रतीला घाबरून अशा घटनांमध्ये फसविले गेलेले बहुतांश जण पोलिसात तक्रार देत नाहीत. सोशल मीडियातील फेक अकाऊंटवरून गुन्हेगार डाव साधत असल्याने पोलिसांचीही डोकेदुखी वाढत आहे.

वैवाहिक जीवनातील कलह, जोडीदाराकडून लैंगिक अपेक्षा पूर्ण न होणे, कमी वयात झालेले लग्न, घटस्फोट, अधिकचा पैसा अशा गोष्टींमुळे समाजातील काही लोक सेक्सटॉर्शनला बळी पडत आहेत. अशा लोकांच्या मोबाइलवर सोशल मीडियाद्वारे एखाद्या सुंदर ललनेची अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट येते. त्यानंतर, औपचारिक 'चॅटिंग' सुरू होते. काही कालावधी जाताच व्हिडीओ कॉलिंग सुरू होते. अश्लील हावभाव आणि संवाद रेकॉर्ड केले जातात. त्यानंतर पैशांची मागणी होते. नकार दिला तर रेकॉर्ड केलेले व्हिडीओ आणि चॅटिंग व्हायरल करून बदनामी करायची धमकी देऊन ब्लॅकमेलिंग केले जाते. अनेकजण गुन्हेगारांच्या दबावाला बळी पडतात आणि लाखो रुपयांना फसविले जातात.

सुरुवातीला या प्रकारच्या जाळ्यात सेलिब्रिटी, राजकारणी, इतर क्षेत्रांतील प्रसिद्ध व्यक्तींना ओढले जात होते. फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम अशा सोशल मीडियातील ॲप्सचा वापर करून हा गोरखधंदा केला जातो. आता तर सेक्सटॉर्शनचे लोण पनवेलच्या ग्रामीण भागातही पसरले आहे. सेक्सटॉर्शनचे ग्रामीण व्हर्जन म्हणजे हनी ट्रॅप. या प्रकारात महिलांचा वापर करून पैसेवाले सावज जाळ्यात ओढले जाते. त्यानंतर, सावजाकडून पैसा उकळला जातो. शहरी भागासोबतच आता ग्रामीण भागातही हनी ट्रॅपचे लोण पसरत चालले आहे. यातून अनेक जणांनी आत्महत्या केलेले आहेत. आत्महत्या हा यावरचा उपाय नाही. घडलेल्या प्रकाराची माहिती जवळच्या मित्रांना, नातेवाईकांना द्या आणि पोलीस ठाण्यात तक्रार करा, असे आवाहन करण्यात येत आहे.

### सावधानता बाळगा

**कोणत्याही अनोळखी महिलेची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. स्वीकारल्यास त्यांना व्हॉट्सप क्रमांक देऊ नये. कुठलीही वैयक्तिक माहिती देऊ नका. खासगी विषयावर कुठलाही संवाद करू नका. अनोळखी क्रमांकावरून आलेला व्हिडीओ कॉल स्वीकारू नका. असे केल्यास तुमचा व्हिडीओ कॉल आणि स्क्रीनशॉट काढून तुम्हाला बदनाम करण्याची धमकी देऊन पैशांची मागणी होईल. त्यामुळे अशा फसव्या कॉलपासून अधिक सतर्क राहा. पनवेल तालुक्यातील कित्येक १८-२५ वयोगटातील मुलांना या गोष्टी भोगायला आल्या आहेत. काहींनी तर गळफास लावून जीवन संपविले तर काहींनी विष प्राशन करून स्वतःला संपवलं तर काहींनी रेल्वेच्या रुळावर जाऊन जीवन संपविले आहे. आजकालच्या तरुणांमध्ये हे सर्व जनजागृती करणे गरजेचे आहे.**

# बँकेची इंटरनेट सेवा कोलमडली

**। खांब । वार्ताहर ।**

बँक ऑफ महाराष्ट्र खांब शाखेत इंटरनेटसेवा कोलमडल्याने ग्राहकांचे मात्र चांगलेच झाले असल्याचे दिसून आले.

खांबसारख्या ग्रामीण भागात ही शाखा कार्यरत असल्याने या विभागातील रहिवाशांसाठी अर्थ व्यवहाराच्या दृष्टीने ही बँक ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा समजली जाते. त्यातच खांब विभागात बँकिंग क्षेत्रातील व्यवहारासाठी ही एकमेव बँक असल्याने या बँकेला खांब विभागात मोठे महत्त्व आहे. शुक्रवार, दि. २४ रोजी कोलमडून पडलेली इंटरनेट सेवा आणि दि. २३ रोजी बँकेला सार्वजनिक सुट्टी असल्याने याचा मोठा फटका मात्र ग्राहकांना चांगलाच बसला असल्याचे दिसून आले. सध्या मान्सूनपूर्व शेती हंगामातील करावी लागणारी पूर्वतयारीची कामे तसेच महिलांचीही वर्षअखेर मे महिन्याच्या शेवटच्या टप्प्यातील कामे सुरू असल्याने त्यांची कामेही बँकेतील अर्थव्यवहाराशी संबंधित असल्याने बंद पडलेल्या इंटरनेट सेवेचाही फटका गृहिणी व शेतकरी वर्गालाही सहन करावा लागत आहे.

अवकाळी पावसाने उन्हाळी भातशेतीला चांगलाच फटका बसला असल्याने शेतकरी पुरता खचला आहे. त्यातच शेतीच्या कामासाठी लागणारी रक्कम इंटरनेटअभावी कोणताही आर्थिक व्यवहार न झाल्याने शेतकरी वर्गाला रिकाम्या हाताने परतावे लागले.

# आंबे काढणीतून अनेकांच्या हाताला काम



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मे महिनाअखेर सुरू असून, आंबे काढणीचा हंगाम अंतिम टप्प्यात आहे. रायगड जिल्ह्यातही बागायतदार, व्यावसायिक आंबे काढणीच्या कामात दंग आहेत. यातून अनेकांच्या हाताला काम मिळू लागले आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये १२ हजारांहून अधिक आंबा उत्पादनक्षम क्षेत्र आहे. जिल्ह्यात आंबा लागवडीवर अनेक शेतकरी भर देऊ लागले आहेत. तरुणदेखील आंबा लागवडीकडे वळू लागला आहे. यंदा आंब्याला मोहोर चांगला आला होता. मात्र ढगाळ वातावरण, अवकाळी पावसामुळे तो गळून पडला. त्यामुळे आंबा उत्पादनावर त्याचा परिणाम झाला. रायगड जिल्ह्यात यंदा आंब्याचे उत्पादन कमी असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. आंबा काढणीला सुरुवात झाली आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये आंबा काढण्याचे काम केले जात आहे. आंबा काढणीतून अनेकांना रोजगार मिळत आहे. या कामाच्या मोबदल्यात दिवसाला सहाशे ते सातशे रुपये मजुरी कामगारांना दिली जात आहे. काही जण आपल्या कुटुंबियांसमवेत आंबा पॅकिंगचे काम करीत असताना दिसत आहेत.

> **आंबे काढणीला सुरुवात झाली आहे. यंदा उत्पादनात घट झाली आहे. अवकाळी पावसासह बदलत्या वातावरणामुळे आंब्याला डाग पडले आहेत. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून या आंब्यांना मागणी नाही. त्यामुळे डाग लागलेले आंबे स्थानिक बाजारात विक्रीसाठी पाठविले जाणार आहेत.**
>
> **- सुनील घरत, आंबा उत्पादक**

पान १ वरुन

## डोक्यावरचा हंडा उतरणार कधी?

२९ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्यात येत होता. यावर्षी त्यामध्ये वाढ झाली असून, आता ८ गावांची वाढ झाली आहे; तर ८६ वाड्यांची अधिक भर पडली आहे. रायगड जिल्ह्यातील धरणांनी तळ गाठला आहे. अनेक गावे, वाड्यांमध्ये पाण्याचा दुष्काळ निर्माण झाला आहे. रोहा तालुक्यातील भातसईपासून लक्ष्मीनगर, झोळांबेमधील नागरिकांना चातक पक्ष्याप्रमाणे पंधरा-पंधरा दिवस पाण्यासाठी वाट पाहावी लागत आहे. पाण्यासाठी दोन किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. त्यामुळे महिला प्रचंड त्रस्त झाल्या आहेत. घरपोच पाणी कधी मिळणार, असा सवाल प्रत्येक महिलावर्गातून विचारला जात आहे.

केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन मिशन अंतर्गत प्रतिव्यक्ती ५५ लीटर पाणी देण्याची घोषणा करण्यात आली. रायगडमध्ये जिल्हा परिषदेमार्फत योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. गावागावात मुबलक पाणी वेगवेगळ्या जलस्त्रोतामार्फत देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी करोडो रुपये खर्च करण्यात आले. तरीदेखील जिल्ह्यामध्ये मे महिन्यात पाण्याची समस्या भीषण झाली आहे. जिल्ह्यात तीनशेहून अधिक गावांना ४३ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. पाण्याची टंचाईने चाकरमानीदेखील त्रस्त झाले आहेत. मे महिन्याच्या सुट्टीत गावी आलेल्या मुंबईकरांमध्ये तीव्र नाराजी निर्माण होत असून, महिला वर्गांमध्येदेखील संताप निर्माण झाला आहे.

## कारवाईविरोधात होर्डिंग मालक न्यायालयात

सिडकोने होर्डिंग काढण्याचे दिलेले आदेश रद्द करावेत, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. देवांगी आऊटडोअर ॲडव्हर्टायझिंग व हरमेश दिलीप तन्ना यांनी ॲड. शिवम दुबे व ॲड. दीपांजली मिश्रा यांच्यामार्फत दोन स्वतंत्र याचिका दाखल केल्या आहेत. या याचिकांमध्ये सिडकोसह नगर विकास खात्याच्या प्रधान सचिवांनाही प्रतिवादी करण्यात आले आहे. महामार्गावर मोठे होर्डिंग लावण्याचा कंपनीचा व्यवसाय आहे. कंपनीतर्फे पनवेल पालिकेच्या स्थापनेपूर्वी ग्रामपंचायती तसेच जागा मालकांच्या ना हरकत दाखल्यावर जाहिरात फलक लावण्यात आले आहेत. पालिकेच्या स्थापनेनंतर पालिकेच्या जाहिरात विभागाने फलक कंपन्यांकडून जाहिराती पोटी आकारण्यात येणारे शुल्क सदर कंपन्याकडून वसूल केले आहे. असे असताना केवळ एका कंपनीच्या फायद्यासाठी सिडको तसेच पनवेल पालिकेच्यावतीने इतर जाहिरात फलक कंपन्यांच्या फलकांवर कारवाई करण्यात येत असल्याचा आरोप कंपन्या करत आहेत.

**फलक अनधिकृत कसे?**

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीदरम्यान आता अनधिकृत ठरवण्यात आलेल्या फालकांवर सर्वच पक्षाच्या उमेदवारांनी आपले बॅनर झळकावून प्रचार केला. या करता त्यांना सर्वच प्राधिकरणांनी मंजुरी दिली असे असताना आता तेच फलक कोणत्या निकषावर अनधिकृत ठरवण्यात आले, असा प्रश्न फलक उभारणाऱ्या कंपन्याना पडला आहे.

सिडकोचे हे आदेश बेकायदा आहेत. आमचे होर्डिंग्ज अधिकृत आहेत. तरीही होर्डिंग्ज काढण्याची नोटीस सिडकोने दिली आहे. या याचिकांवर तातडीने सुनावणी घ्यावी, अशी मागणी ॲड. वैभव चारलवार यांनी न्या. नितीन बोरकर व न्या. सोमशेखर सुंदरेसन यांच्या सुट्टीकालीन खंडपीठासमोर शुक्रवारी केली. या याचिकेवर येत्या सोमवारी सुनावणी घेतली जाईल, असे खंडपीठाने स्पष्ट केले. ॲड. वैभव यांना ॲड. मोहसिन खान व ॲड. रामेश्वरी दुबे यांनी सहकार्य केले.

## वेळेआधीच जंजिरा कुलूपबंद

जलदुर्ग हा सर्वात मोठा पॉईंट आहे, यात दुमत नाही. २३ मेपासूनच समुद्रात हळूहळू वादळी घडामोडी होण्यास सुरुवात झाली होती. या घडामोडी कदाचित शांत होतील, अशी आशा फोल ठरल्याचे राजपुरी बंदर जेट्टीवर सांगण्यात आले. अचानक वातावरणात बदल झाल्याने जंजिरा जलदुर्ग निर्धारित वेळेआधीच बंद करण्यात आला आल्याने पर्यटकांची घोर निराशा झाल्याचे स्पष्ट दिसून आले.पर्यटन व्यावसायिकांचेदेखील नुकसान होणार आहे.

समुद्रात लाटांचा उसळण्याचा वेग वाढला असल्याचे खोरा बंदर जेट्टीवरून शनिवारी दुपारी दिसून आले.जंजिरा जलदुर्गाजवळील प्रवेशद्वारावर पर्यटकांना उतरणे धोकादायक बनल्याने केवळ शिडाच्या बोटी आणि मोटर लाँचमधून पर्यटकांना जंजिरा बाहेरून दाखविण्यात आला. खोरा जेट्टीवर मुरूड पर्यटन जलवाहतूक सहकारी संस्थेच्या चार लॉन्च असल्याचे संस्थेचे खोरा येथील लिपिक बबन सतवीडकर यांनी दिली. पुणे, मुंबई, कोल्हापूर, पश्चिम महाराष्ट्राच्या विविध भागातून पर्यटक जलदुर्ग बंद असल्याची माहिती नसल्याने येतच होते. गुरुवारपासूनच समुद्रात लाटा उसळत असल्याची माहिती एकदरा कोळी समाज अध्यक्ष, मुरूड मच्चीमार कृती समिती अध्यक्ष तथा हनुमान मच्छिमार सहकारी संस्थेचे चेअरमन पांडुरंग आगरकर यांनी दिली.

## माथेरान गजबजले

महिन्यातील शेवटच्या विकेंडला हजारोंच्या संख्येने पर्यटक दाखल झाले आहेत. स्वच्छ ताजी हवा, आल्हाददायक निसर्गसौंदर्य, हिरवी वनराई असलेल्या माथेरानला पर्यटकांचा ओघ वाढलेला आहे. येथील निसर्गरम्य पॉईंट, घोड्याची रपेट आणि लाल मातीच्या रस्त्यावरून भटकंती करताना देशी-विदेशी पर्यटकांची गर्दी बघायला मिळत आहे.

गेल्या काही दिवसांपूर्वी पाऊस पडल्यामुळे सकाळ व संध्याकाळ ढगाळ वातावरण होत आहे. तसेच मे महिन्यातील या शेवटच्या विकेंडला अश्वशर्यतींचे आयोजन असल्याने पर्यटकांना अश्वशर्यतींचा थरार अनुभवयास मिळणार आहे. आत्ता पुढील जून महिन्यामध्ये शाळा सुरू होणार असल्याने अनेक जण या शेवटच्या विकेंडला सहकुटुंब पर्यटनासाठी आलेले दिसत आहेत. त्यामुळे माथेरान शहरातील हॉटेल्स हे पूर्ण क्षमतेने भरल्याचे चित्र येथे दिसत आहे.

## सोमवारी दहावीचा निकाल

२०२४ मध्ये घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे. मंडळाच्या https://mahresult.nic.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या निकालासोबत निकालाबाबतची इतर सांख्यिकी माहिती उपलब्ध होईल. तसेच mahahsscboard.in या संकेतस्थळावर शाळांना एकत्रित निकाल उपलब्ध होईल.

## मतदान टप्प्यांचा षटकार पूर्ण

-राजौरी लोकसभा मतदारसंघातून रिंगणात आहेत. दरम्यान, ११ कोटींहून अधिक मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावून उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद केले आहे.

सहाव्या टप्प्यात हरियाणामध्ये १० जागा, बिहारमध्ये आठ जागा, झारखंडमध्ये चार जागा, ओडिशात सहा जागा, उत्तर प्रदेशमध्ये १४ जागा, पश्चिम बंगालमध्ये आठ तर, दिल्लीत सात आणि जम्मू-काश्मीरमध्ये सात लोकसभा जागांवर मतदान सुरू आहे. यानंतर शेवटच्या टप्प्यातील मतदान १ जून रोजी होणार आहे. त्यानंतर ४ जून रोजी मतमोजणी होणार असून, निकाल स्पष्ट होणार आहे.

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यातील प्रमुख उमेदवारांमध्ये धर्मेंद्र प्रधान (भाजपा) संबलपूर (ओडिशा), मनोज तिवारी (भाजपा) आणि कन्हैया कुमार (कॉंग्रेस) ईशान्य दिल्ली, सुलतानपूर (उत्तरप्रदेश) मेनका गांधी (भाजपा), अनंतनाग-राजौरी (जम्मू आणि काश्मीर) मधून मेहबूबा मुफ्ती (पीडीपी), तमलूक (पश्चिम बंगाल) मधून अभिजित गंगोपाध्याय (भाजपा), आणि भाजपाकडून मनोहर लाल खट्टर (कर्नाल, हरियाणा), नवीन जिंदाल (कुरुक्षेत्र) आणि राव इंद्रजीत सिंग (गुडगाव) यांचा समावेश आहे.

# यंत्राच्या सहाय्याने भातकापणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**





कर्जत तालुक्यात अवकाळी पावसाने भाताच्या शेतीचे नुकसान झाले आहे. भाताच्या पिकाचे आणखी नुकसान होऊ नये यासाठी गौरकामत भागातील शेतकरी यंत्राच्या सहाय्याने भाताची कापणी करीत आहेत. या भागातील ३५ एकर जमिनीवरील भाताची कापणी करण्यात आली आहे. दरम्यान, अवकाळी पावसाने जरी नुकसान केले असले, तरी यांत्रिकीकरणाचा शेतकऱ्यांना फायदा झाला आहे.

तालुक्यात मोठ्या पप्रमाणात दुबार भाताची शेती केली जाते. यावर्षी अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यात गारपीट झाल्याने भाताच्या शेतात पाणीच पाणी काही दिवस साचून राहिले होते. त्यामुळे भाताची कापणी करून भाताचे पीक सुखरूपपणे घरात नेण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु होती. त्यावेळी या सर्व शेतकऱ्यांच्या मागे निल इनपुट या संस्थेच्या माध्यमातून कम्बाईन हार्वेस्टरचे सहाय्यतेसाठी भाताची कापणी करण्यासाठी मदत केली. निल इनपुटचे नैनेश दळवी यांनी गौरकामत यांनी त्या गावातील प्रशांत जोशी यांच्या शेतात तसेच त्या गावातील भातशेती करणारे शेतकरी सुनील भागवत, अनिल देशमुख, प्रसाद जोशी, मोहन राणे यांच्या तब्बल ३५ एकर जमिनीमधील भाताची यंत्राच्या साहाय्याने केली. त्यामुळे भाताची कापणी करण्यासाठी या शेतकऱ्यांना मजूर घ्यावे लागले नाही.

गौरकामत गावातील या शेतकऱ्यांनी भाताची कापणी यंत्राच्या ाहाय्याने केली आहे.त्याचवेळी भाताची पेरणी हीदेखील टोकरणी पद्धतीने ड्रम सिडरच्या माध्यमातून जानेवारी महिन्यात केली होती. कर्जत तालुक्यात यांत्रिकीकरणातून भाताची शेती करण्यावर शेतकऱ्यांचा कल दिसून येत आहे. याप्रसंगी कृषी विभागाचे उपविभागीय अधिकारी नितीन फुलसुंदर, तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड तसेच मंडळ कृषी अधिकारी दिनेश कोळी आदी उपस्थित होते.

निवडक

## प्रवासी वर्गाची नारजी

**तळा :** एप्रिल व मे महिन्यात लग्न सराई, गावकीच्या पूजा, पालख्या यांसारख्या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर गावी दाखल झालेले मुंबईकर चाकरमानी पुन्हा आपल्या परतीच्या प्रवासाला लागले आहेत. लहान मुले तसेच वयोवृध्द नागरिकांना प्रवास सोयीस्कर व्हावा यासाठी बहुतांश चाकरमानी आरक्षित तिकिटे काढण्याचा पर्याय निवडतात. मात्र, तळा बसस्थानकात आरक्षित तिकिटे मिळण्याची सुविधा बंद करण्यात आल्याने या सर्व प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

## मठाचा वर्धापनदिन सोहळा

**तळा :** शहरातील कासार आळी येथे स्वामी समर्थ मठाचा प्रथम वर्धापनदिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. ज्यामध्ये पहाटे काकड आरती, सकाळी गणेश पूजन, पुण्यवाचन व षोडषोपचार पूजा, मूर्तीवर अभिषेक, होमहवन, दुपारी महाप्रसाद, सायंकाळी पारायण, महाआरती यांसारखे धार्मिक कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमाप्रसंगी तालुक्यातील प्रमुख मान्यवर, श्री स्वामी समर्थ मठ कासार आळीचे सर्व सदस्य व स्वामी सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खेळ खेळूया पैठणीचा

**पनवेल :** गौतम बुद्धजयंतीनिमित्त प्रबुद्ध सामाजिक संस्था करंजाडे यांच्या विद्यमाने महिलांसाठी 'खेळ खेळूया पैठणीचा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाची सुरुवात बौध्दचारी जगताप यांनी बुद्धवंदनेनी केली. यावेळी खेळ खेळूया पैठणीचा या विशेष कार्यक्रमाचे निवेदन दिग्दर्शक विशाल सावंत यांनी केले. महिलांसाठी विविध खेळ घेऊन महिलांचे मनोरंजन केले. खेळादरम्यान महिलांसाठी पैठणी व विविध बक्षिस देण्यात आले.

## अपघातात तरुण जखमी

**पनवेल :** यश मोरे हा एक्टिवा गाडीने खारघर येथून सीबीडी बेलापूरकडे येत असताना रिझर्व बँके समोरील रस्त्यावर पाठीमागून आलेल्या चार चाकी गाडीने धडक दिली. या धडकेत यश गाडीवरून खाली पडून गंभीर जखमी झाला. त्याला सीबीडी येथील एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्याच्या दोन्ही पायांना व उजव्या खांद्याला फ्रॅक्चर झाले आहे. चारचाकी चालक विपिन सिंग रावत (३९) यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उरण येथे बुद्ध पौर्णिमा

**उरण :** बौद्धजन पंचायत समिती उरण शाखा व माता रमाई महिला मंडळ बौद्ध वाडी यांच्यावतीने नुकतेच बुद्ध विहार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे बौद्ध पौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी बौद्धजन पंचायत समिती अध्यक्ष प्रकाश कांबळे, हरेश जाधव, विजय पवार, अनंत जाधव व कार्यकारी, सर्व सदस्य तसेच माता रमाई महिला मंडळ कमिटी अध्यक्ष सुनीता सपकाळे, संगीता जाधव, करूणा भिंगावडे, सविता साळवी व सर्व सदस्य आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यात बांधबंदीस्तीच्या कामांना वेग

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**पावसाळा सुरु होण्यासाठी मोजकेच दिवस शिल्लक राहिले आहेत. त्या निमित्ताने पावसाळा सुरु होण्यापुर्वीची मशागतीची कामे सुरु झाली आहेत. बांधबंदीस्तीसह अन्य कामांना वेग आला आहे. शेतकरी या कामांमध्ये मग्न असल्याचे दिसून येत आहे.**



रायगड जिल्ह्यात पावसावर अवलंबून असलेल्या भात पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. ९५ टक्केहून अधिक शेतकरी पावसावर अवलंबून असलेली शेती करतात. जिल्ह्यामध्ये एक लाखाहून अधिक भात लागवडीचे क्षेत्र आहे. पावसाळा सुरू होण्यासाठी दहा दिवस शिल्लक राहिले आहेत. यंदा पाऊस लवकर पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. त्यामुळे जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. पाऊस कधीही पडू शकतो या भीतीने शेतकऱ्यांनी शेतावरील मशागतीची कामे सुरु केली आहेत. बांधावरील सुके गवत काढणे, राब तयार करणे, ते जाळणे, बांधबंदीस्ती करणे, अशा अनेक प्रकारच्या कामांना वेग लागला आहे. अलिबागसह अनेक तालुक्यात शेतीच्या मशागतीची कामे केली जात आहेत. या कामांना वेग आला असून ही कामे अंतिम टप्प्यात असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

> पावसाळा जवळ आला आहे. त्यापुर्वी शेतातील बांधबंदीस्तीसह अन्य कामे सुरु केली आहेत. मजूरकर भेटत नसल्याने कूटूंबियासोबत ही कामे केली जात आहेत.
> – रामचंद्र शिंदे, शेतकरी

शेतकामासाठी मजूर भेटत नसल्याने काही ठिकाणी कुटूंबियांसमेवत बांधबंदीस्तीची कामे केली जात आहेत. तर, काही ठिकाणी रोजंदारीवर कामे केली जात आहेत. मात्र, उन्हाचा तडाखा वाढल्याने बहुतांशी ठिकाणी सकाळी साडेसहा वाजल्यापासून ऊन डोक्यावर येईपर्यंत शेतावर बांधबंदीस्तीची कामे करीत आहेत. पुरुषांबरोबरच महिला वर्गदेखील या कामात मग्न असल्याचे दिसून येत आहे.

## इमारतीतील खानावळीला आग

**पनवेल :** कळंबोली वसाहतीमधील सेक्टर १ परिसरात असलेल्या एका इमारतीतील खाणावळीत आग लागण्याची घटना शनिवारी (दि.२५) दुपारी २ च्या सुमारास घडली. या आगीत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसली तरी खानावळीतील साहित्य जळून खाक झाले आहे. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी पोहचलेल्या सिडकोच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी अगीवर नियंत्रण मिळवले आहे. तसेच, दर वर्षी उन्हाळ्याच्या दिवसात आगीच्या घटनांनमध्ये वाढ होत आहे. पनवेल पालिका हद्दीतदेखील आगीच्या घटना वाढ झाल्याचे पहायला मिळत आहे.

# रोह्यात अवैध मटका राजरोसपणे सुरू

### पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष; नागरिकांचा संताप

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

गेल्या काही महिन्यांपासून रोहा शहरात अवैध मटका जुगार राजरोसपणे सुरू झाले आहेत. या मटका जुगारामुळे अनेकांच्या संस्कारांची राखरांगोळी झाली आहे. अनेक अल्पवयीन मुले या वाम मार्गाला लागलेली आहेत. तर, काहींनी जुगारापोटी जीव गमावला असल्याच्या धक्कादायक घटना समोर आलेल्या आहेत.

मटका जुगारात गुंतवणूक कमी, नफा जास्त या मानसिकतेतून अनेक तरुण पिढीचा या धंद्याकडे कल दिसून येत आहे. युवकांचा वाढलेला कल आणि पोलीस विभागाकडून होणाऱ्या दुर्लक्षामुळे मटका जुगार धंद्याला मोकळे रान मिळाले आहे. युवक या आकडेवारीच्या खेळापोटी तासनतास वाया घालवत असून कर्जबाजारी व नशेच्या आहारी जाण्याचे प्रमाण वाढले आहे. या अवैध धद्यांबाबत आरडाओरडा झाल्यास तात्पुरते धंदे बंद ठेवले जातात व परिणामी छुप्या पद्धतीने धंदे चालविले जातात. आणि पुन्हा काही दिवसांनंतर परिस्थिती जैसे थे असते. यामुळे आता तरी पोलिस प्रशासन या अवैध धंद्यावर कारवाई करणार का, असा संतप्त सवाल नागरिकांमधून होत आहे.

# यूपीएससी उत्तीर्ण प्रशांत भोजने यांचा सत्कार

**। पाली । वार्ताहर ।**



यूपीएसी परीक्षेचा अभ्यास करीत असताना तथागत गौतम बुद्ध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व इतर थोर समाजसुधारक महापुरुषांचे वाचन करुन अभ्यास करण्याची एकाग्रता व आवड निर्माण झाली असल्याचे प्रतिपादन यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेले प्रशांत सुरेश भोजने यांनी केले. भेरव येथील सत्कार समारंभप्रसंगी ते बोलत होते.

ठाणे येथील नागसेन नगरसारख्या कामगार वसाहतीत राहून यूपीएससी परीक्षा प्रशांत भोजने यांनी उत्तीर्ण करुन आई वडिलांचे स्वप्न साकार केले. यासाठी प्रशांतने नऊ वर्ष मेहनत घेऊन तासनतास अभ्यास केला. त्यामुळे यूपीएससी सारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण होऊन घवघवीत यश मिळविले. यासाठी प्रशांतच्या आई-वडीलांनी प्रचंड मेहनत घेऊन कोणत्याही गोष्टींची कमी पडू दिली नाही. या घवघवीत यशाबद्दल प्रशांत भोजने यांचे विविध संस्था, राजकीय पक्ष व आंबेडकरी जनतेकडून सत्कार करण्यात येत आहेत. त्यातच सुधागड तालुक्यात देखील वाघोशी ग्रामपंचायत व आदर्श नगर भेरव यांच्यावतीने उपसरपंच दिपक पवार यांच्या भेरव येथील संविधान या निवासस्थानी प्रशांत भोजने यांचा सत्कार समारंभ करण्यात आला.

पुढे मार्गदर्शन करताना प्रशांत भोजने म्हणाले, जीवनात काही बनायचे असेल तर फक्त दहावी, बारावी किंवा ग्रॅज्युएशनपर्यंत मर्यादित राहू नका, तर त्यापुढे शिका. एमपीएससी, यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षा द्या. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने चालत असलेली बार्टी ही संस्था आपल्याला स्कॉलरशिप देते, त्याचा फायदा घेण्याचे आवाहन देखील प्रशांत भोजने यांनी यावेळी केले.

# महाजनेमध्ये बुध्द जयंती सोहळा

### बुध्द व आंबेडकरांच्या मुर्तींची प्रतिष्ठापना

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



महाजने येथील बौध्द ग्रामस्थ व महिला मंडळाच्यावतीने गुरुवारी (दि.२३) बुध्द जयंती सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने गौतम बुध्द व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. बौध्दाचार्य ओव्हाळ गुरूजींच्या मार्फत हा कार्यक्रम पार पडला.

महाजने गावांतून सकाळी भगवान बुध्द आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्तीची मिरवणूक रथातून काढण्यात आली. या मिरवणूकीमध्ये बौध्द ग्रामस्थ, महिला मंडळ, तरुण मंडळी, नातेवाईक, मित्रमंडळी, सगेसोयरे आदी असंख्य अनुयायी सहभागी झाले होते. यावेळी, गौतम बुध्द व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयघोष, फटाक्यांची आतषबाजी करीत ही मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर विधीवत पुजा करीत बौध्दाचार्य ओव्हाळ गुरूजी, महेश जाधव यांच्या मार्फत ग्रामस्थ व महिलांच्या हस्ते मुर्तीची विधीवत पुजा करण्यात आली.

यावेळी ओव्हाळ गुरूजींनी वैशाख पौर्णिमा, बुध्द पौर्णिमेचे महत्व पटवून देत उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यानंतर ग्रामस्थांच्यावतीने उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ व गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. आनंदमय व मंगलमय वातावरणा हा सोहळा पार पडला.



## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२६ मे
१) श्री. पुरूषोत्तम पदु धुमाळ
मु.पेझारी-अलिबाग, २६-५-१९४२
२)श्री.विनोद वारलुजी खवसकर
तळकर नगर अलिबाग २६-५-१९६०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-**
८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**
**श्री. धीरज बाबुलाल शाह, मुंबई**

# अवकाळीने वीज कर्मचाऱ्यांची उडाली झोप

## जीर्ण खांब, झाडाच्या फांद्या महावितरणाची बनली डोकेदुखी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

पावसाळा अवघ्या कांही दिवसावर येऊन ठेपला असतानाच अवकाळी वादळी पावसाने आपले उग्र रूप धारण केले आहे. या काळात माणगाव तालुक्यातील विविध गावात वारंवार वीज खंडित होण्याचे प्रकार घडत आहेत. उष्णतेने अधिक व्याकुळ झालेल्या नागरिकांना विजेच्या या लपंडावाचा मोठा फटका बसत आहे. अवकाळी वादळी पावसाने अचानकच थैमान घातल्यामुळे सुस्तावलेल्या विज महावितरण कंपनी अधिकारी व कर्मचाऱ्यांची चांगलीच झोप उडाली आहे.

अनेक ठिकाणी वीज वितरण कंपनीचे जीर्ण झालेले खांब तसेच विद्युत वाहिनीवर येणाऱ्या झाडांच्या फांद्या ही सर्वांची डोकेदुखी बनली आहे.

गेल्या पंधरा दिवसापासून माणगाव तालुक्यात अवकाळी वादळी पावसाने अक्षरशः थैमान घातले आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी जीर्ण झालेले विद्युत खांब कोसळले आहेत. तर ठीक ठिकाणी विद्युतवाहिनीवर येणाऱ्या झाडांच्या फांद्या पडतात. त्यामुळे वीज वाहिनी तुटते. त्याचबरोबर अनेक वीज समस्यांना वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे. या वीजवाहिनीवर असणारी झाडे तोडण्यास परवानगी नसल्यामुळे वीज वाहिणीवर येणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडून वीजपुरवठा चालू करण्यासाठी कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

माणगाव तालुका हा तीन विभागात विखुरला गेला आहे. गोरेगाव उपविभाग, माणगाव उपविभाग आणि रोहा उपविभाग या तीन उपविभागापैकी बहुतांश उपविभागाचे काम ६० ते ७० टक्के माणगाव उपविभाग सहाय्यक अभियंता यांच्याकडे येते. या तालुक्यात वेगवेगळे फिडर बसविण्यात आले असून या फिडरमार्फत वीजपुरवठा केला जातो.

पावसाळ्यापूर्वी विज महावितरण कंपनी झाडांच्या फांद्या तोडून वीजपुरवठा सुरळीत कसा करता येईल यासाठी प्रयत्न करते. वीज वितरण कंपनीचे ५० टक्के कर्मचारी कायम स्वरूपी काम करीत आहेत. उर्वरित ५० टक्के कर्मचारी ठेकेदरी पद्धतीवर काम करीत आहेत. एका बाजूला विजेचे वाजवी दर लावले आहेत. वीज वापर, वीज कर, वीज भाडे, मीटर भाडे असे विविध कर लावून ग्राहकावर लाईट बिल आकारण्यात येते. ग्राहक ते वेळोवेळी भरतात मात्र ग्राहकांना चांगली सेवा देणे हे शासनाचेही कर्तव्य आहे. वीज वितरण कंपनीत अनेक कर्मचाऱ्यांची रिक्त पदे आहेत. ही रिक्त पदे शासन कधी भरणार हा प्रश्नच आहे. सध्या माणगाव शहरात तसेच तालुक्यातील विविध गावात विजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याच्या घटना घडत असल्याने नागरिक कमालीचे हैराण झाले आहेत. वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे नागरिकांना पाणीपुरवठा योजना तसेच विजेवर चालणारे झेरॉक्स, पिठ चिक्की, हॉटेल व्यवसायिक, दूध संकलन केंद्र, मच्छी व्यवसायिक तसेच विजेवर चालणारी सर्व उपकरणे यांना मोठा फटका बसत आहे. त्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.

मंगळवारी आम्ही या फिडरवर विजेचे मेंटेनन्सचे काम करतो. त्यामुळे वीजपुरवठा बंद करावा लागतो. तसेच माणगाव उपविभागातील काही गावात असणारे विजेचे खांब नुकत्याच झालेल्या अवकाळी वादळी पावसाने कोसळले आहेत. ते बसवण्याचे काम युद्ध पातळीवर केले. तसेच, काही जीर्ण झालेले विजेचे खांब बदलण्याचे काम वितरण कंपनीने हाती घेतले आहे. विद्युतवाहिनी खाली असणारी झाडे तोडण्याची परवानगी आम्हाला नसल्यामुळे या वाहिनीवर येणारी झाडाच्या फांद्या तोडण्याचे काम आम्ही करत आहोत. अशावेळी नागरिकांनी आम्हाला सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक अभियंता बामणकर यांनी केले आहे.

# माणगांव पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

**। माणगांव । प्रतिनिधी ।**

माणगांव पोलीस नेहमी आपले चोख कर्तव्य बजावीत असताना सामाजिक कार्यात देखील अग्रेसर असतात. अशीच एक कौतुकास्पद कामगीरी माणगांव पोलिसांनी केली आहे.

शुक्रवारी (दि.२४) पो. शि. बोरकर व पो.शि. पवार हे नाईट गस्त करीत असताना माणगाव एसटी स्टँड समोर बेवारस बॅग सापडली. ती बॅग ताब्यात घेऊन माणगाव पोलीस ठाणे येथे येऊन बॅग चेक केली असता बॅगमध्ये पाच तोळ्याचे मंगळसूत्र, अर्धा तोळ्याची चैन व रोख रक्कम ५०,००० रु असे एकूण ३,७५,००० रु. चा मुद्देमाल मिळून आला. पो. नि. राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या बॅगेबाबत इसमाचा शोध घेऊन प्रमोद चरण मोहिते म्हसळा हे त्यांच्या मुळ गावी मुंबई माणगाव प्रवास करीत असताना गडबडीत उतरून बॅग विसरून दुसऱ्या खासगी गाडीने गेल्याचे समजले. त्यांना माणगांव पोलीस ठाणे येथे बोलावून बॅग देण्यात आली. या कामगीरी बाबत माणगांव पोलिसांचे सर्वत्र कौतूक होत आहे.



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

# उच्छाद मांडलेल्या २० माकडांना पकडले

**। रत्नागिरी । प्रतिनिधी।**

कोकणात गेली काही वर्ष माकडांचा उपद्रव वाढला आहे. त्यामुळे अनेक शेतकरी बागायतदारांनी शेती, भाजीपाला करणे सोडून दिले आहे. माकडांच्या बंदोबस्तासाठी कोकणात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोठा आंदोलन उभे राहिले होते. अतिशय बुद्धिमान आणि हुशार असलेली माकड सुरक्षितरित्या पकडणं हे तसं मोठं आव्हान असतं, पण आता या सगळ्यावर वनविभागाने नामी शक्कल लढवत माकडांसाठी पिंजरा आणला आणि एक नाही दोन नाही तब्बल २० माकडं जेरबंद करण्यात वन विभागाला यश आलं आहे. माकडांना आवडणारे खाद्य आंबा, केळी, शेंगा अशा खाऊचे अमिष दाखवून या माकडांना पिंजऱ्यात सुरक्षितरित्या अलगद बंद करण्यात आले. पिंजऱ्यात तीन कप्पे करण्यात आले आहेत. माकडं पकडण्यासाठी वन विभागाने मोहीम आखली पण यासाठी कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कंबर कसली.

# मातीचे ढिगारे तात्काळ हटवण्याचे जिल्हाधिऱ्यांचे आदेश

**रत्नागिरी :** पावसाळ्यापूर्वी महामार्गाच्या बाजूला असणारे मातीचे ढिगारे तात्काळ हटवावेत, अशी सक्त सूचना जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी संबंधित ठेकेदार कंपनींना दिल्या आहेत. त्याचबरोबर नगर परिषदेने शहरातील रस्त्यांची दुरुस्ती, साईडपट्टींचे काम तातडीने पूर्ण करावे असे निर्देहशी त्यांनी दिले. जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह, पोलिस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी चौपदरीकरण रस्त्याच्या कामाबरोबरच दुरुस्ती, साईडपट्टी, कचरा, रस्त्याच्या कडेला असणारा मातीचा ढिगारा, वाहतुकीला होणाऱ्या अडचणीबाबत गुरुवारी पाहणी केली. त्यावेळी संबंधित यंत्रणांना त्यांनी सूचना दिल्या. जिल्हाधिकारी सिंह यांनी मारुती मंदिर येथील चौकात वाहतूक सुरळीत होण्यासाठी पार्कींग, स्टॉपिंग पट्टी करण्याबरोबरच या ठिकाणी रस्त्याच्या बाजूला डांबरीकरणाचा थर करण्याची सूचना दिली. साळवी स्टॉप येथे चौपदरीकरणाची पाहणी करुन हे काम गतीने करावे तसेच पाऊस पडल्यानंतर बाजूला असणारे मातीचे ढिगारे वाहून चिखल होणार नाही, याची दक्षता घेऊन ते बाजूला करावेत. कुवारबाव आणि हातखंबा येथेही रस्त्याच्या कामाची पाहणी करुन दिशादर्शक फलक, रम्बलर लावण्याची सूचना जिल्हाधिकारी यांनी केली.

# शेलू नेरळ रस्त्याचे डांबरीकरण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कल्याण कर्जत राज्यमार्ग रस्त्यावरील शेलू नेरळ वडवली भागातील रस्त्याचे काँक्रिटीकरण सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत आहे. बांधकाम खात्याने निवृत्त कनिष्ठ अभियंता सूर्यकांत चंचे यांच्या सूचनेनंतर बांधकाम खात्याने या रस्त्याला जोडणाऱ्या नेरळ ग्रामपंचायतीकडील रस्त्याचे डांबरीकरण देखील करून दिले आहे. कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्ता शासनाने हायब्रीड तत्त्वावर दहा वर्षांसाठी पी.पी. खारपाटील या ठेकेदाराला बनविण्यास दिला आहे. पावसाळा तोंडावर असल्याने रस्त्यावर पडलेले खड्डे यामुळे पावसाळयात रस्ता आणखी खराब होऊ नये यासाठी संबंधित ठेकेदार कंपनीकडून रस्त्यावर डांबरीकरण केले जात आहे. कल्याण-कर्जत राज्यमार्गावरील शेलू ते वडवली हा भाग डांबरीकरणाचे तर वडवलीपासून पुढे कर्जत चार फाटापर्यंत हा रस्ता काँक्रिटचा बनविला गेला आहे.



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# तुंगी येथील रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील दुर्गम भाग असलेल्या तुंगी गावाकडे जाणारा रस्ता जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांच्याकडून नव्याने तयार केला जात आहे. या रस्त्याच्या कामासाठी शासनाच्या २५/१५ योजनेमधून ७० लाखाचा निधी मंजूर आहे. दरम्यान, त्या निधीमधून बिबिएम डांबरीकरण आणि त्यावर कार्पेट डांबरीकरण ही कामे मंजूर असताना त्या रस्त्यावर खडीकरण, मातीचा भराव अशी कामे सुरू आहेत. त्यामुळे निधीचा अपव्यय झाला असल्याचे दिसून येते.

तुंगी या दुर्गम भागात जाणाऱ्या रस्त्याचे काम वन विभागाने परवानगी दिल्यानंतर हा रस्ता तीन वर्षापूर्वी खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रयत्नाने बनविण्यात आला. त्यावेळी खडीकरण करण्यात आल्या नंतर पावसाळ्यात तीव्र उताराचा हा रस्ता वाहतुकीस अडथळा बनू लागला होता. स्थानिक आमदारांनी रस्त्याच्या डांबरीकरण आणि मजबुतीकरणाच्या कामासाठी निधी मंजूर करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार २५/१५ मधून तब्बल ७० लाखाचा निधी रस्त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरण करण्यासाठी निधी मंजूर झाला होता.



त्या निधीमधून तुंगी गावाकडे जाणाऱ्या एक किलोतीटर लांबीच्या रस्त्याचे बिबीएम डांबरीकरण आणि कार्पेट डांबरीकरण ही कामे मंजूर झाली होती. मात्र, गेली काही महिने या भागातील लोकांना आपल्या घरी जाताना रस्त्यावर खडी बाहेर आल्याने मोठा त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे उन्हाळयाच्या शेवटच्या महिन्यात लोकसभा निवडणुकीचे मतदान पार पडल्यावर रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. डोंगरपाडा येथून तुंगी गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण आणि त्यावर मातीचा भराव अशी कामे सध्या सुरू आहेत. मात्र खरे मंजूर काम हे डांबरीकरण करण्याचे होते. परंतु तेथे डांबरीकरण करण्याबाबत कोणत्याही हालचाली दिसून येत नाही. पूर्वी या रस्त्यावर खडीकरण केले गेले असल्याने अस्तित्वात असलेल्या रस्त्यावर रोलरने फिरवल्यावर बीबीएम डांबरीकरण केले जाणे अपेक्षित होते. मात्र सध्या तेथे ७५० मिटर अंतराचा रस्ता मंजूर निधी मधून तयार केला जात आहे. त्यामुळे तुंगी गावात डांबरी रस्ता नेण्याचे सरकारचे नियोजन हे फोल ठरणार आहे.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे वर्णे, ता.कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वर्णे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| दारायस बरजोर बांद्रावाला | २२ | १/अ | ०-६९-१० पैकी | २.१२ |
| | | | लिहून देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०-३३-९० | ०.७३ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : २६/०५/२०२४

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ताः कोर्ट व्ह्यु को. ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो.: ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ता:ओम श्री भाग्योदय को.ऑप.हौ.सो.
कोतवाल नगर, कर्जत, जि. रायगड
मो.: ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

# माथेरानमध्ये जनरेटरची खरेदी करणार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या पर्यटन स्थळी २० किलोमीटर अंतरावरून पाणी येत असते. त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाल्यावर माथेरानमध्ये पिण्याच्या पाण्याचे संकट निर्माण होते. परिणामी माथेरानमध्ये पर्यटन धोक्यात येत असते. ते लक्षात घेऊन माथेरानमधील सर्व पक्षीय आणि व्यापारी तसेच हॉटेल व्यवसायिक यांनी रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी जनरेटर बसवून देण्याची मागणी केली होती. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नेरळ-कुंभे ते माथेरान मार्गावरील तीन ठिकाणी जनरेटर बसविण्यासाठी स्थळ पाहणी केली. अजय सावंत, उमेश दुबल, राजेश चौधरी, चंद्रकांत जाधव यांनी अधिकारी वर्गासह उपस्थिती राहून जनरेटर सुविधा कशी असली पाहिजे यावर चर्चा केली.

# मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबीर



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

श्री रामनवमीच्या निमित्ताने माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान कर्जत, ज्योविस आयुर्वेदा हॉस्पिटल व नारी सामाजिक संस्था दादर-मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने श्री छत्रपती शिवाजी महाराज मंडळ, पाटील आळी कर्जत यांच्या सहकार्याने मोफत आयुर्वेदिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ३१० रुग्णांनी लाभ घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

शिबिराचे उद्घाटन कर्जतचे पोलिस निरीक्षक सुरेंद्र गरड यांचे हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, डॉ. मणिशंकर गुप्ता, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, मनीषा सुर्वे, विजय सातपुते यांच्यासह श्री छत्रपती शिवाजी मंडळाचे अध्यक्ष गजानन गुरव, माजी अध्यक्ष अशोक शिंदे, दत्तात्रेय म्हसे, पंच्छी गुप्ता, दीपक जाधव, अजय सातपुते, हरिश्चंद्र राऊत आदी उपस्थित होते.

यावेळी ३१० रुग्णांची तपासणी डॉ. राज सातपुते यांच्यासह डॉ. मणिशंकर गुप्ता, डॉ. कोमल सोळंके, डॉ. पूजा कुबल, डॉ. ध्रुव दमानिया, डॉ. विधी जयस्वाल, डॉ. अदिती ओझा, डॉ. सौरभ कुशवाह, डॉ. आकाश तिवारी, डॉ. ऋतुजा पोटे, डॉ. कोमल सोळंके, डॉ. दत्ता गिरम तसेच आयेशा वाडकर, प्रतीक्षा ठोंबरे, प्रविणा तिर्धनकर, प्रीती घाडी, तनिष सोलंकी यांनी तपासणी करून त्यांच्यावर योग्य उपचार करून मोफत औषधे दिली.

# अनिल राणे यांची पुरस्कारासाठी निवड

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**



गोवा गव्हर्नमेंट पीडब्ल्यूडी स्टाफ को. ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड गोवा, इंटिग्रेटेड सोशियल वेलफेअर सोसायटी बेळगाव, नॅशनल रुरल डेवलपमेंट फाउंडेशन बेळगाव यांच्यावतीने २०२३-२४ या वर्षाकरीता दिला जाणारा राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी अनिल कृष्णा राणे, मुख्याध्यापक शाळा नवघर यांची निवड झाली आहे. या पुरस्कारासाठी दिल्ली, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, गुजरात या राज्यातून शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा २६ मे रोजी गोवा येथे संपन्न होणार आहे. या पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी गुरव, रत्नशेखर गजभिये, मोहिते, साधुराम बांगारे, ग.रा.म्हात्रे, क.रा.शिंदे, मोरेश्वर कांबळे यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे बेलवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. धर्मा दत्तू दळवी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याबाबत आमचे अशिलांच्या वाटाघाटी चालू आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| बेलवली | २८७ | ०-०३-०० | ०.०८ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, अदलाबदल, कुळवहिवाट, कसवणुक या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे असिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ता. २६/०५/२०२४

**ॲड. माधवी नारायण ठाकूर.**
सी-३०१, 'क्लिफ हेवन'
को. ऑप. हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, कृष्णा शालिनी अपार्टमेंट पहिला मजला रूम नं.१०३, घरत आळी, एस.टी.स्टँडजवळ, अलिबाग/रायगड
- बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नावनोंदणी ४८ शाखा, वेबसाईट नोंदणीसाठी -९२२६७६६१२९
- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८९३५७७५
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/नापास मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ८ तास ड्युटी, ठिकाण-बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना. Contact- ९०४९६५५५२३
- अलिबाग मधील ऑफिसकरीता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन, आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय२५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- अलिबाग मधील वडापाव स्टॉलवर कामासाठी करागिर पाहिजे अर्धा/पूर्ण दिवस ७०६६१३८३६८
- बजाज शोरूम अलिबागमध्ये कामासाठी (टू व्हिलर) मेकॅनिक पाहिजे संपर्क : प्रबोध राऊत ९७०२४५९१५१ बजाज शोरूम बायपास रोड अलिबाग
- कॉटेज/बंगलो/घर किंवा इतर मालमत्ता पर्यटन व्यवसायासाठी भाड्याने पाहिजे. ७०६६१३८३६८
- अकाउंटट पाहिजे B.com ,Tally ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार- ८००० महिना संपर्क : ९८२३५८५३२१

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# महावितरणचा खेळखंडोबा

## वीज ग्राहकांची मोहोपाडा कार्यालयावर धडक

**। रसायनी । वार्ताहर ।**

मे महिन्यातच विजेचा लपंडाव सुरु राहिल्याने रसायनी परिसरातील वीज ग्राहकांत नाराजीचा सूर उमटला आहे. परिसरात कुठे ना कुठे दररोज वीज वारंवार खंडित होत असल्याने या रणरणत्या उन्हात अंगाची लाही लाही होत असल्याने वीज ग्राहक संताप व्यक्त करीत आहेत. अखेर शुक्रवारी (दि. २४) दुपारी सरपंच उमा मुंढे यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी मोहोपाडा येथील महावितरण कार्यालयावर धडकले. त्यांनी उपअभियंता यांना वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचे कारण विचारुन निवेदन दिले.



मोहोपाडा परिसरात वस्ती वाढत असल्याने ट्रान्सफॉर्मरवर लोड येत आहे. शिवाय, मोहोपाडा मुख्य बाजारपेठ ते डोंगरीपर्यंत व्होल्टेज १५० पेक्षा कमीच राहात असल्याने नागरिकांच्या विद्युत उपकरणांचे नुकसान होत आहे. मोहोपाडा येथील वीजप्रवाहाचे लोखंडी पोल जमिनीपासून खराब झाल्याने पावसाळ्यात कधीही कोसळून मोठा अपघात होऊ शकतो. ग्राहकांना भरमसाठ वीजबिल आकारणी, रात्री-अपरात्री वीजपुरवठा खंडित होणे, दिवसाआड वीजपुरवठा खंडित करुन ग्राहकांची कुचंबणा केली जात असल्याने रसायनीतील सर्वपक्षीयांत महावितरणाविरोधात नाराजीचा सूर उमटला आहे.

# मुरुड-आगरदांडा रस्त्याची साईडपट्टी धोकादायक

## उपाययोजना करण्याची मागणी

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड-आगरदांडा रस्त्यावर डांबरीकरणात साईडपट्ट्या न भरण्यात आल्याने धोकादायक ठरत आहेत. त्यात अरुंद रस्ते असल्याने जणू अपघाताला आमंत्रण देत आहेत. रस्त्यावरील गतिरोधकांमध्ये वाढ झाल्याने प्रवाशांना निश्चित स्थळी पोहोचण्यास विलंब होत आहे.

गेल्या कित्येक वर्षांच्या विलंबानंतर मुरुड-आगरदांडा रस्ता चकाचक झाला आहे. परंतु, हा रस्ता बनविताना साईडपट्ट्या भरण्यात न आल्याने धोकादायक बनला आहे. त्यात खोकरी ते आगरदंडा रस्ता अतिशय अरुंद आहे. त्यामुळे या रस्त्यावर दोन वाहने आली की अडथळा निर्माण होतो. त्यात या रस्त्याच्या कडेला असलेल्या साईडपट्ट्या अतिशय खोलगट झाल्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी दुचाकीस्वारांचा प्रवास धोकादायक बनला आहे. या मार्गावर रोजच एकातरी दुचाकीस्वाराचा अपघात होत असतो.



मुरुड-आगरदांडा रस्त्यावर खोकरीपासून आगरदांड्यापर्यंत एक ते दोन फूट खोल साईडपट्ट्या झाल्या असून, त्या लवकरात लवकर भरण्यात याव्यात व या ठिकाणी अतिशय अरुंद रस्ता आहे त्याचे रुंदीकरण व्हावे तसेच या रस्त्यावर जुन्या गतिरोधकांबरोबर नव्याने गतिरोधकांमध्ये वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे प्रवास करताना प्रवाशांच्या वेळेची बचत न होता ना प्रवासास विलंब होत असल्याने सार्वजनिक बांधकाम खात्याने याची दखल घेऊन या रस्त्यावरील साईडपट्ट्या भरण्यात याव्यात व वाढीव गतिरोधक हटविण्यात यावेत, अशी मागणी वाहनचालक व स्थानिकांकडून जोर धरीत आहे.

# पावसाळापूर्वीच्या कामांना मुहूर्त कधी ?

**। आपटा । वार्ताहर ।**

पावसाळा तोंडावर आलेला असताना आपटा ग्रामपंचायत हद्दीतील कामांना अद्याप मुहूर्त मिळालेला नाही. ग्रामपंचायतीकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत असून, ही कामे तात्काळ हाती घेण्यात यावीत, अशी मागणी होत आहे.

आपटा गावातील पिंपळ आळीमधील गटारातील पाणी रस्त्यावर आले आहे, गटारे तुंबलेली असून, त्यांची अद्याप साफसफाई केलेली नाही. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, नागरिकांना ये-जा करताना नाक धरुन प्रवास करवा लागत आहे.

आपटा गावात दरवर्षी पूर येतो, त्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात आली पाहिजे. पाताळगंगा नदी ही आपटा गावातील रेल्वे पूल ते जुना कोळीवाडा गावाची

### आपटा ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष, नागरिकांमध्ये संताप

हद्द संपेपर्यंत नदी खोल केली पाहिजे. गावातील बापदेव मंदिराच्या जवळ जो रोड नदीच्या पाण्यातून जातो, तो बंद करुन तेथे घाट बांधला पाहिजे. नदीच्या काठावर संरक्षक भिंत उभारली पाहिजे. जर या उपाययोजना केल्या, तर पुराचे पाणी गावात भरणार नाही, असे नागरिकांचे म्हणणे आहे. पिंपळ आळीमधील रोड जो फुटला आहे, तो तातडीने दुरूस्त करावा, पथदिवे सुरू करावे, गावातील मोठे नालेसफाईच्या कामाला सुरुवात केली नाही. ही कामे होणार तरी केव्हा असा प्रश्न विचारला जातो आहे. ग्रामपंचायत सदस्य काहीच लक्ष देत नाहीत, असा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# लक्ष्मी पाटील यांचे निधन

**। उरण । वार्ताहर ।**

नवी मुंबई कुकशेत नेरूळ येथील लक्ष्मी सदाशिव पाटील यांचे गुरुवारी (दि. २३) अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या



६४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती सदाशिव पाटील, मुलगा भूषण पाटील, चार मुली अनिता पाटील, सुनिता गावंड, वनिता पाटील, रसिका शेलार, नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शनिवारी (दि. १ जून) दिवाळे मानसरोवर येथे सकाळी १० वाजता, तर तेरावे उत्तरकार्य मंगळवारी (दि ४ जून) १२ वाजता राहत्या घरी कुकशेत, नवी मुंबई येथे होणार आहे.

# माणगावमध्ये धाडसी चोऱ्या

## लाखोंचा ऐवज गायब; दोन दुचाकींचा समावेश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

माणगाव परिसरात तीन दिवसांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी चोऱ्या झाल्या. त्यामध्ये दोन दुचाकी घरातील सोन्याचे दागिने, रोख रक्कम असा एकूण सहा लाख ८ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. या घटनेने भुरट्या चोरट्यांनी डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे.

माणगाव तालुक्यातील पोस्को कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर फिर्यादीने त्याची दुचाकी शनिवारी (दि.१८) दुपारी पार्किंग करून ठेवली होती. चोरट्याने ती चोरून नेली. एकूण २५ हजार रुपये किमतीची दुचाकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. माणगावमधील बंद घरात घुसून रविवारी (दि.१९) सकाळी चोरट्याने कपाटातील दागिने व रोख रक्कम असा एकूण चार लाख ९८ हजार ४०० रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला.

माणगाव एसटी बसस्थानकाच्या आवारात सोमवारी (दि. २०) सकाळी दुचाकी फिर्यादीने पार्किंग केली होती. चोरट्याने तीदेखील गायब केली. ८५ हजार रुपयांची दुचाकी असून, याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविण्यात आली आहे. तीन दिवसांमध्ये तीन ठिकाणी चोऱ्या झाल्याने मालमत्ता सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याबाबत पोलीस गांभीर्याने घेतील का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.



# तंबाखूविरोधात रुग्णांमध्ये प्रबोधन

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत दि.३१ मे जागतिक तंबाखू विरोधीदिन सर्वत्र साजरा करण्यात येतो. या अनुषंगाने दि. २४ मे रोजी तंबाखू सेवनामुळे शरीरास होणारे गंभीर दुर्दर आजारासंबधी रुग्णांकरिता प्रबोधन व्याख्यान उपजिल्हा रुग्णालय रोहा येथे आयोजित करण्यात आले होते.

जिल्हा रुग्णालय अलिबागतर्फे उपजिल्हा रुग्णालय रोहा येथे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या मार्गदर्शनाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. अभय ससाणे म्हणाले की, तंबाखूचे सेवन आरोग्यास धोकादायक आहे. तंबाखूच्या सेवनाचे आजपर्यंत कितीतरी लोकांना स्वत:चे प्राण गमवावे लागलेले आहेत. सुरुवातीला मज्जा म्हणून जडलेली सवय ही कालांतराने अत्यंत घातक परिणाम घडवून आणत असल्याने मनुष्याचे त्यापासून आगोदरच सावध असणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधीक्षक डॉ. अभय ससाणे होते. सामाजिक कार्यकर्ते सुशील साईकर, सुराज्य सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी यांची विषेश उपस्थिती होती. दंतरोगतज्ज्ञ डॉ. मनीषा ससाणे यांनी व्याख्यान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विश्वनाथ देशमुख, तर आभार प्रदर्शन सिस्टर इंचार्ज उर्वी वाणी यांनी केले. कार्यक्रमास दुर्गम ग्रामीण भागातील नागरिक व आदिवासी रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाहे येथे हनुमान मंदिराचा वर्धापनदिन

**। खांब । वार्ताहर ।**

संपूर्ण रायगड जिल्ह्यात ताज्या भाजीपाल्याच्या पिकासाठी विशेष सुप्रसिद्ध असणाऱ्या कृषीनिष्ठ बाहे गावात हनुमान मंदिराचा प्रथम वर्धापनदिन सोहळा शुक्रवारी (दि. २४) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.




हनुमान मंदिराचा प्रथम वर्धापनदिन सोहळ्यानिमित्त सकाळी देवतांना अभिषेक व पूजाविधी तर सायंकाळी पालखी सोहळा तद्नंतर महाप्रसाद आदी धार्मिक कार्यक्रम पारपडले. पालखी सोहळ्यातंर्तग हनुमंताची पालखी संपूर्ण गावातून काढण्यात आली. या सोहळ्याचे यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच तरूण मंडळ यांनी मोलाचे सहकार्य केले.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २६ मे ते ०१ जून २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## नवीन बदलांसाठी तयार राहा




**मेष :** राशीधारकांना आपले ग्रहमान पाहता सप्ताहाच्या मध्यभागी, आपण आपल्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही धार्मिक तीर्थयात्रा किंवा पर्यटनस्थळांच्या पर्यटनासाठी जाऊ शकता. या काळात आपल्या भावंडांना आरोग्याचा त्रास होऊ शकतो. अभिनय, नाटक, ललित कला, सर्जनशील कार्य, छायाचित्रण, समाज सेवा, माहिती तंत्रज्ञान, सिव्हिल अभियांत्रिकी, कायदा आणि समाज सेवा इच्छुक किंवा काम करणाऱ्यांसाठी चांगले दिवस असण्याची शक्यता आहे. या कालावधीत केवळ आपल्या कामात प्रगती होईलच; परंतु या कार्यामुळे तुमचा सन्मानही वाढेल. राजकारणाच्या क्षेत्रातही काही लोकांना चांगले यश मिळू शकेल आणि सल्लागार म्हणून काम करणाऱ्यांना चांगले निकाल लागल्यास पदोन्नती मिळण्याची चांगली संधी मिळेल. या राशीच्या लोकांनी आपले प्रियजन, मित्र आणि सहकाऱ्यांसह नवीन बदलांसाठी तयार राहिला पाहिजे. **महिलांना-** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभ दिनांक** - २६,२८

## परदेशागमनाची संधी मिळेल



**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपला फिरण्याचा योग आहे. ज्यांनी विदेशात प्रवास करण्याची इच्छा मनामध्ये घेतली आहे, त्यांची इच्छा चालू काळात पूर्ण होण्याची शक्यता आहे. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता म्हणून तुम्हाला पैशासंबंधित व्यवहाराबद्दल विचार करणे चांगले होईल. आपल्याला सखोल गोष्टी जाणून घेण्यास स्वारस्य असेल आणि अध्यात्माशी संबंधित लोकांना खूप चांगले अनुभव येतील. धर्माशी संबंधित लोकांना वेगळ्या पद्धतीने धर्म उपदेश करण्याची संधी मिळू शकते आणि त्यांच्या शिष्यांची संख्या वाढेल. सप्ताहाच्या शेवटापर्यंत, आपल्याला अन्न आणि आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. **महिलांना-** त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक-**२७,२९.

## व्यवसायाला नवी दिशा मिळेल




**मिथुन :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता विचारपूर्वक नवीन करारांचा अवलंब करा. आपल्या अहंकारावर नियंत्रण ठेवणे आपले प्रथम प्राधान्य असले पाहिजे. कारण आपण यात अयशस्वी झाल्यास आपण बऱ्याच संधी गमावाल. काही कठोर निर्णय घ्यावे लागतील; परंतु हे आपल्याला आपले जीवनचक्र सुधारण्यास मदत करेल. हा कालावधी आपल्या आयुष्यातील एक चांगले आणि महत्त्वाचे पर्व असेल. आपण सामाजिक कार्यात सक्रियपणे सहभागी व्हाल. आपण प्रयत्न केल्यास तर यावेळी आपले घर तयार करण्यास सक्षम असाल आणि आपल्याला एखादी मालमत्ता खरेदी करायची असेल तर त्यात यशदेखील मिळेल. तरीही तुमची शक्ती वाढलेली असेल, तुमच्या व्यवसायाला नवी दिशा मिळेल. ही दिशा तुम्हाला तुमच्या क्षेत्रात काम करण्यास प्रवृत्त करतील. आपला खर्च वाढेल आणि काही आरोग्यास त्रास होईल. मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **महिलांना-** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. **शुभ दिनांक-** ३०,३१

## विचारपूर्वक निर्णय घ्या




**कर्क :** राशीधारकास या सप्ताहात योग्य अशा खर्चाचा अंदाज अगोदर ठेवणे व त्यानुसार वागणे हितकारक ठरेल. आपल्या कामांना चांगला प्रतिसाद मिळेल. कुटुंबाकडे अधिक लक्ष द्या. जोडीदाराची साथ मिळेल. आपण एकूण ग्रहमान पाहता अनुकूल वातावरण असले तरी सर्व बाबतीत शांत विचाराने वागण्याचे ठरविल्यास अपेक्षित यश प्राप्त करता येईल. स्पर्धा-परीक्षेत आत्मविश्वासाने सामोरे जा व यशाची वाटचाल करण्यास तयार व्हा. कलाक्षेत्राला चांगला प्रतिसाद मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. राजकीय व क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ उत्तम राहील. आपणास यशस्वी व्हायचे आहे हे लक्षात ठेवून वागा. आर्थिक बाजू ठीक राहील. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. प्रकृती जपा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. एकूण ग्रहमान पाहता सर्व बाबतीत सामंजस्य ठेवल्यास हा आठवडा उत्तम जाऊ शकेल. **महिलांना-** आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. नको त्या प्रलोभनात अडकू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक** - २६,२७

## नोकरदारांना दिलासा मिळेल




**सिंह :** राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. ग्रहमान ठीक असले तरी आपण नको ती आश्वासने देण्याचे टाळल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येणे शक्य होईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. काही भाग्यवंतांना प्रसिद्धीचे वलय प्राप्त होण्याची संधी मिळेल. थोरामोठ्यांच्या संपर्कात राहाल. सरकारी नियमांचे पालन करा. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. मुलांकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. राजकीय क्षेत्रातील मंडळींना हा काळ चांगला राहील. जोडीदाराशी मिळते-जुळते घेणे योग्य ठरेल.आपले एकूण ग्रहमान पाहता आपल्या कर्तृत्वाला बऱ्याच प्रमाणात वाव मिळेल व पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नव्या जबाबदाऱ्या येण्याची शक्यता राहील. प्रलोभनांपासून मात्र दूर राहणे योग्य राहील. **महिलांना-** विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तींचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभदिनांक-** २८,३१

## जोडीदाराची साथ लाभेल



**कन्या :** राशीसाठी या सप्ताहात ग्रहमान पाहता आपण घेत असलेल्या परिश्रमांना सर्व बाबतीत सफलता मिळू शकते. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला चांगला वाव मिळेल. विद्यार्थीवर्गाला त्यांच्या श्रमांना योग्य दाद मिळेल. अपयशाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिल्यास मागे वळून पाहण्याचे टाळू शकाल. परिश्रम ही यशाची गुरूकिल्ली आहे हे विसरू नका व त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करा. राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना आपला जम बसविता येईल. सरकारी नियमांचे उल्लंघन होणार नाही याकडे लक्ष द्या. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वागल्यास हा सप्ताह लाभदायक राहू शकेल. स्थावर-जंगम मालमत्तेतील गुंतवणूक फायदेशीर ठरू शकेल. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगणे हितकारक ठरू शकते. **महिलांना-** आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. जोडीदाराची साथ मिळेल. नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा. **शुभदिनांक-** ३०,०१

## कलाकारांसाठी उत्तम काळ




**तुळ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण सर्व बाबतीत सावधानता बाळगल्यास अपेक्षित गोष्टी साध्य होऊ शकतील. कलाक्षेत्रातील व्यक्तींना उत्तम काळ असून, त्याचा छान लाभ घेता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. व्यवसायात प्रगती करण्याची संधी मिळेल. विवाहइच्छुकांच्या मनोकामना पुऱ्या होण्याची संधी प्राप्त होऊ शकेल. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. आपली प्रतिमा मलीन होणार नाही याकडे लक्ष द्या. संभाषणात शब्दफेक योग्य करा. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण कोणाबरोबरही स्पर्धा करण्याचे टाळल्यास हा आठवडा चांगला जाऊ शकेल. आपल्या बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. शेतीविषयक व कोर्टकचेरीच्या कामांना चालना मिळेल. **महिलांना-** कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. हाती घेतलेल्या कामांना सफलता मिळेल. येणाऱ्या प्रसंगांना शांततेने सामोरे जा. आपल्या कार्यात अधिक लक्ष द्या. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. **शुभदिनांक-** २७,२९

## अनावश्यक खर्च टाळा



**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या कार्यक्षेत्रात झोकून देण्याचे ठरविल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल. गरज नसलेल्या विचारांना थारा देऊ नका. नोकरदारांना दिलासा मिळेल. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. अनावश्यक खर्च टाळा. प्रकृतीची पथ्ये पाळा. गाठीभेटीचे योग संभवतात. घरासंबंधीच्या प्रश्नांना चालना मिळेल. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपण आपल्या दैनंदिन व कौटुंबिक कारणांसाठी खर्चावर योग्य नियंत्रण ठेवल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाजू सावरता येईल. प्रवासात सावधानता बाळगा. वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवा. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. स्थावरसंबंधीच्या कामांना चालना मिळेल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. **महिलांना-** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला, त्यामुळे मनावर ताण येणार नाही. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. **शुभ दिनांक-** २६,२८.

## नोकरीत बदलाचे योग



**धनु :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीच्या लोकांना यावेळी बऱ्याच चांगल्या भेटवस्तू मिळतील, ज्यामुळे तुमचे मन प्रसन्न राहील. या राशीची ग्रहस्थितीमुळे या धारकाला नफ्याच्या मार्गावर घेऊन जाईल. परिणामी, हळूहळू आपल्या कौटुंबिक जीवनातील समस्या सुटतील आणि आपले धैर्य आणि पराक्रम वाढतील आणि आपण अनेक कठीण कार्ये सहजपणे करू शकाल. परंतु आपल्याला प्रत्येक कामात आपले उत्कृष्ट योगदान द्यावे लागेल, तरच आपण अपेक्षित कृत्ये करण्यास सक्षम असाल. यावर्षी पैसे मिळवण्यावर अधिक लक्ष केंद्रित करून सहल कमी कराल. आपण आवश्यकतेनुसार प्रवास कराल आणि विशेषत: आपल्या व्यवसाय किंवा कार्याच्या संबंधात प्रवास कराल आणि या सर्व सहल आपल्यासाठी फायदेशीर ठरतील. नोकरीत बदल करू शकता. **महिलांना-** ह्या महिन्यात आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या दहा दिवसात पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. महिलावर्गाला सासूरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभ दिनांक-** २७,३०.

## हातून चांगली कामे होतील



**मकर :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या लोकांना या कालावधीत मिश्रित फळ मिळेल. हा कालावधी आपल्यासाठी काहीसे आव्हानात्मकदेखील असू शकतो, परंतु आपल्या दृढइच्छेमुळे आपण प्रत्येक समस्येचा सामना करण्यास सक्षम असाल. आपली ग्रहस्थितीमध्ये परदेश भ्रमणाची प्रबळ शक्यता आहे. आनंदाची बाब म्हणजे अधिकांश प्रवासात तुम्हाला यश मिळेल. तीर्थयात्रा करण्यास चांगला योग आहे. पण आपल्याला आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. कारण, प्रतिकूल परिस्थितीत आपल्याला रुग्णालयात जावे लागू शकते. तुमचा खर्च वाढेल आणि तुम्ही काही चांगली कामे कराल विशेष करून धर्म आणि सद्गुण कामात खर्च कराल. तुम्हाला अधिक पैशांचा नफादेखील मिळेल, परंतु खर्चही त्याच प्रमाणात वाढेल. **महिलांना-** आपली माहेरची माणसे घरी येतील, त्यांची ऊठबस करावी लागेल. कामात असताना तब्बेतीकडे दुर्लक्ष करू नका. आपण आपली अस्मिता क्षुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **शुभदिनांक-** २८,२९.

## संयम ठेवून कार्य करा



**कुंभ :** या सप्ताहाचे ग्रहमान पाहता बरीच महत्त्वपूर्ण आणि कठीण निर्णय घ्यावी लागू शकतात, जे कदाचित आपल्या आजूबाजूच्या लोकांना चांगले दिसू शकत नाहीत, परंतु तरीही हे आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे पाऊल असल्याचे सिद्ध होईल. परोपकाराची भावना तुमच्यामध्येही जन्माला येईल आणि तुम्ही लोकांच्या मदतीसाठी पुढे जाऊ शकता. तथापि, या सर्व असूनही आपण मानसिक असमाधानी राहाल आणि आपल्या मनात एक विचित्र अस्वस्थता असेल. कोणत्याही प्रकारच्या चिंतेत अडकू नका आणि आपले कौटुंबिक जीवन किंवा व्यावसायिक जीवन सर्वत्र विचारपूर्वक कार्य करीत असेल तरीही संयमाने कार्य करा. सप्ताहाच्या शेवटी आपल्यासाठी अनुकूल परिणाम मिळेल. जो तुम्हाला तुमच्या विरोधकांवर विजय मिळवून देतील. नंतरचा कालावधी मुलांसाठी आणि शिक्षणासाठी अडचणींनी भरलेला असू शकतो. **महिलांना-** आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. संसर्गजन्य आजारा पासून तब्बेत सांभाळा. **शुभ दिनांक-** ३०,३१.

## भाग्य उजळवणारा काळ



**मीन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान बऱ्याचपैकी चांगले जाणार असून, ते आपल्या वैयक्तिक संबंधांना स्थायित्व आणि मजबुती देऊ शकतील. यावर्षी सहलींसाठी चांगली चिन्हे नाहीत, म्हणून कोणत्याही मोठ्या योजनांचा विचार करू नका. तथापि, नंतर परिस्थिती बदलेल आणि तुमच्या काही दूरवरच्या सहली होतील. येणाऱ्या दिवसांत पहिल्या काही दिवसांत प्रवाशांसाठी परिस्थिती फारशी चांगली नाही; परंतु मध्यभागी काहीसे चांगले दिवस असतील आणि पुढील काही दिवसात परदेश दौऱ्यासाठीही परिस्थिती योग्य असेल. यावेळी आपण बाहेर गावी जाण्यासाठी इच्छित असल्यास तर आपण आपल्या इच्छित ठिकाणी व्हिसादेखील मिळवू शकता. तुम्ही अशीही काही कामे कराल जी समाजाच्या हिताची असतील आणि तुम्ही परोपकारीही व्हाल. एखाद्यास अडचणीत पाहून आपण त्याला मदत करण्याचा प्रयत्न कराल आणि सुसंवाद आणि शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न कराल. **महिलांना-** महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून, अचानक आपले भाग्य उजळून निघणार आहे. एखादी लॉटरी घेण्यास हरकत नाही. **शुभदिनांक :** ३०,०१

**पुण्यातल्या ताज्या 'हीट अँड रन' प्रकरणातील पोलिसांचा आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न, पिझ्झा खाऊ घालण्याची कृती आणि न्यायालयाने दिलेला निर्णय नागरिकांच्या संतापाचा कडेलोट करणारे होते. जनक्षोभ उसळताच या दिवट्याला पुन्हा नव्या कलमांखाली दोषी धरण्यात आले आणि बापासह तुरुंगात धाडण्यात आले. मात्र पुन्हा असा दुर्दैवी प्रकार घडणार नाही, याची शाश्वती पोलीस यंत्रणा आणि राज्य प्रशासन देऊ शकणार आहे का? मुळात कायद्याची चोख अंमलबजावणी झाल्याखेरीज असे प्रकार थांबणे अवघड आहे.**

मोहोर

# कायद्याची चोख अंमलबजावणी का नाही?

प्रा. नंदकुमार काळे





पुण्यातल्या ताज्या 'हीट अँड रन' प्रकरणातही पोलिसांचा आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न, पिझ्झा खाऊ घालण्याची कृती आणि न्यायालयाने दिलेला निर्णय नागरिकांच्या संतापाचा कडेलोट करणारे होते. आरोपी हा काही पोलिसांचा पाहुणा नाही; परंतु यंत्रणा पैसेवाल्यांपुढे कशी लोटांगण घालते आणि सामान्यांच्या जगण्याला इथे काडीचीही किंमत कशी नसते, हे वारंवार प्रत्ययाला येते. मग लोकप्रतिनिधीही पैसेवाल्यांसाठी धावून जातात. सामान्यांचे मरण त्यांच्यासाठी संवेदना निर्माण करत नाही. पुण्यात अलिकडे चर्चेत राहिलेल्या अल्पवयीन मुलाने बेदरकारपणे गाडी चालवून दोनजणांचा जीव घेण्याच्या घटनेने अनेकांचे भावविश्व ढवळून काढले. या प्रकरणातील आरोपी असलेला बांधकाम व्यावसायिकाचा मुलगा वेदांत याने दिलेला जबाब तर अधिक चिंतन करायला लावणारा आहे. पालकांनी मुलांना चांगले संस्कार द्यायचे असतात; परंतु पैसेवाल्या पालकांना मुलांवरच्या संस्कारापेक्षाही प्रतिष्ठा महत्त्वाची वाटते. या प्रकरणात एकाच कायद्याचे उल्लंघन झाले असे नाही, तर अनेक कायदे पायदळी तुडवूनही यंत्रणांनी डोळ्यावर कसे कातडे ओढून घेतले होते, हे दिसले.

आपला अल्पवयीन मुलगा मद्यप्राशन करतो, हे माहीत असूनही त्याचा पिता त्याला काहीच विचारत नसेल आणि उलट त्याला पार्टी करायला एक कोटी ८८ लाख रुपयांची महागडी कार घेऊन जायला परवानगी देत असेल, तर या प्रकरणात मुलापेक्षाही त्याचे वडील जास्त दोषी आहेत, असे म्हणावे लागते. या घटनेत ठार झालेले अनिष अवधिया आणि अश्विनी कोस्टा एका बेजबाबदार, बेदरकार मस्तवालाच्या कृत्याला बळी पडले आहेत. मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. मुळात पहाटे दोन-अडीच वाजेपर्यंत पब सुरू कसा राहतो, त्याकडे पोलिसांचे दुर्लक्ष कसे होते, रात्री दहा वाजता वडापाव विक्रेत्याला हाकलून देणारे पोलिस या प्रकरणात हात ओले होत असल्याने गप्प राहतात का आणि अशा घटना घडल्यानंतरच पोलिस आयुक्तही जागे होतात का, असे अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतात.

कायद्यानुसार अपघात झाल्यानंतर संबंधित वाहनचालकाने पळून न जाता पोलिसांना माहिती देणे अपेक्षित आहे. जखमींना रुग्णालयात नेण्याची जबाबदारी संबंधित चालकांची आहे. नव्या कायद्यानुसार अशा प्रकणात दहा वर्षांची शिक्षा प्रस्तावित आहे; परंतु पुण्याच्या घटनेतील दिवटा एका बड्या बांधकाम व्यावसायिकाचा मुलगा आहे. अपघातानंतर पसार होण्याच्या तयारीत असलेल्या या अल्पवयीन मुलाला नागरिकांनी बेदम चोप देऊन पोलिसांच्या ताब्यात दिले. तो एका नामांकित बांधकाम व्यावसायिकाचा मुलगा आहे. या घटनेत ठार झालेले युवक, युवतीही रात्री अडीच वाजेपर्यंत घराबाहेर होते. कल्याणीनगर भागात रविवारी पहाटे झालेल्या या अपघातप्रकरणी वेदांत अग्रवाल याचे वडील आणि पुण्यातील बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांना पुणे पोलिसांनी अटक केली. मुळात अठरा वर्षांच्या आतील मुला-मुलींना मद्य देऊ नये, तसेच मद्य देताना त्यांच्याकडे मद्यसेवनाचा परवाना आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी संबंधित बारचालकांवर असताना हा नियम सर्रास धाब्यावर बसवला जातो. पैसे कमावण्याच्या नादात नियमांना तिलांजली देणाऱ्यांवरही कठोर कारवाई व्हायला हवी. अशा घटना घडल्यानंतर यंत्रणा जाग्या होतात. पोलिस आणि बारमालकांचेही आर्थिक साटेलोटे असते. जनता संतप्त झाली की कारवाईचा तोंडदेखलेपणा केला जातो. आताही अल्पवयीन मुलाला बार आणि पबमध्ये प्रवेश देणाऱ्या हॉटेलच्या मालकावर, बार व्यवस्थापकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे; मात्र याच दरम्यान काही धक्कादायक माहिती समोर आली आहे.

अगरवाल यांच्या दिवट्याने चालवलेल्या या कारची नोंदणीच झाली नव्हती. एवढी महागडी कार विनानोंदणी रस्त्यावर येत असेल तर त्याला पोलीस, उपप्रादेशिक परिवहन विभागही तेवढाच जबाबदार आहे. बंगळुरुमध्ये तात्पुरती नोंदणी करून ही कार पुण्यात आणण्यात आली होती. त्यानंतर मार्चमध्ये नोंदणी करण्याची प्रक्रिया पुण्यातील प्रादेशिक कार्यालयात सुरू होती; मात्र ती अजूनपर्यंत पूर्ण झाली नव्हती. तीन महिने कारची नोंदणी होत नसेल तर हीच का गतिमान प्रशासनाची व्याख्या, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभावीक आहे. ही कार इतके दिवस विनानोंदणी रस्त्यावर धावत असताना यंत्रणा काय करत होत्या, असा प्रश्न उपस्थित होतो. इतर वेळी हेल्मेट घातले नसताना कारवाईचा दंड ठोठवणाऱ्या पोलिसांना मार्चपासून ही कार विनाक्रमांक धावते, हे दिसले नाही का, येथेही बड्या धेंडामुळे पोलीस यंत्रणा त्यांना कुर्निसात करण्यात धन्यता मानत होती का, असे प्रश्न उपस्थित होतात. मी कार चालवण्याचे रीतसर प्रशिक्षण घेतलेले नाही, वाहन चालवण्याचा परवानाही नाही, वडिलांनी महागडी कार माझ्याकडे दिली तसेच मित्रांसमवेत हॉटेलमध्ये पार्टी करण्यास परवानगी दिली. मी मद्यप्राशन करत असल्याचेही वडिलांना माहिती आहे, असे आरोपी वेदांतने सांगितले. वडील बेकायदेशीर वागत असून मुलालाही असेच धडे देत असल्याचे या प्रसंगातून दिसते. हा धनिकपुत्र पुण्यातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक आणि 'ब्रम्हा कॉर्प' या संस्थेचे संचालक विशाल अग्रवाल यांचा मुलगा आहे. या घटनेनंतर प्रचंड संताप व्यक्त होत असताना पोलिसांकडून विशाल अग्रवाल यांच्या मुलाला विशेष वागणूक देण्यात आल्याचा प्रकार घडला. याबद्दल प्रचंड चीड व्यक्त होणे साहजिकच आहे. ससून रुग्णालयात वैद्यकीय तपासणी केल्यानंतर कारचालक मुलगा आणि त्याच्या मित्रांना दुपारी दीडच्या सुमारास येरवडा पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्या वेळी त्याच्या कुटुंबीयांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या परवानगीने मुलांसाठी बाहेरून पिझ्झा आणि बर्गर मागवला होता. एका पोलिसाने हे खाद्यपदार्थ मागच्या बाजूने पोलीस ठाण्यात नेले, हा प्रकार संतापजनक आहे. निष्काळजीपणे गाडी चालवून अपघातास कारणीभूत ठरलेल्या अल्पवयीन मुलाच्या अनुषंगाने पालकांनादेखील तीन वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते.

मोटार वाहन कायद्याच्या कलम १९९ (अ)अंतर्गत अल्पवयीन मुलाचे पालक किंवा गाडीमालकाला अपघातासाठी जबाबदार धरण्यात येईल, अशी तरतूद करण्यात आली असून तीन वर्षे शिक्षेची तरतूददेखील केली आहे. शिवाय आर्थिक दंडदेखील सुनावण्याची तरतूद आहे. भारतीय दंड विधान ३०४ (अ)(अ) नुसार पाल्याने निष्काळजीपणे गाडी चालवल्यास पालकास दोषी धरण्यात येते. वडिलांची गाडी मुलगा चालवत असला तरी संबंधित चारचाकी वाहनाची कायदेशीर कस्टडी ही पालकांचीच असल्याचे नवीन वाहन कायद्यात ग्राह्य धरले आहे. मध्यरात्र असली, तरी पुण्यात ताशी १६० किलोमीटर वेगाने कार चालवली तर तिच्यावर नियंत्रण राहणारच नाही. त्यात मद्यपान केले असल्याने वेगही लक्षात आला नसावा. या अपघातानंतर त्याची वैद्यकीय तपासणीच करण्यात आली नाही, हा आणखी एक अपराध पोलिसांनी केला. गहजब झाल्यानंतर अल्कोहोल तपासणीसाठी त्याचे रक्ताचे नमुने रुग्णालयांकडे पाठवल्याचे सांगण्यात आले. पोलिस नियंत्रण कक्षाला किंवा वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना या अपघाताची माहिती दिलीच नसल्याचे उघडकीस आले आहे. येरवडा पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी अगदी किरकोळ कलमे लावून मुलाच्या जामीनासाठी रेड कार्पेट टाकून दिले. दोघांना किड्या मुंग्याप्रमाणे चिरडणाऱ्या या मुलाला पोलीस ठाण्यात पिझ्झा खाऊ घालणाऱ्या या पोलिसांवर आता गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनक्षोभानंतर कारवाई करण्याचे जाहीर केले.

अल्पवयीन आरोपीला न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेवर नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात आला. न्यायालयाने आरोपीला 'आरटीओ'ला भेट देऊन वाहतूक नियमांची माहिती घेऊन १५ दिवस येरवडा विभागातील पोलिसांसोबत वाहतूक नियंत्रण करावे, वाहतूक जागृतीचे फलक रंगवावे आदी शिक्षा दिली. मानसोपचार तज्ज्ञाकडे जाऊन त्याला उपचार घ्यावे लागणार आहेत. 'रस्ते अपघातांचे परिणाम आणि त्यावरील उपाय' या विषयावर आरोपीला कमीत कमी ३०० शब्दांचा निबंध लिहावा लागणार आहे. पालकांनी त्याला वाईट प्रवृत्तीपासून दूर ठेवावे या अटींवर साडेसात हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. न्यायालयाचा अवमान होण्याची भीती नेहमी असते; परंतु असे निकाल दिल्याने बेमुवर्तखोरांना चाप बसणार आहे का, हा खरा प्रश्न आहे. जनक्षोभ उसळताच या दिवट्याला पुन्हा नव्या कलमांखाली दोषी धरण्यात आले आणि बापासह तुरुंगात धाडण्यात आले. मात्र मुद्दा हा आहे की असा दुर्दैवी प्रकार घडणार नाही, याची शाश्वती पोलिस यंत्रणा आणि राज्य प्रशासन देऊ शकणार आहे का? मुळात कायद्याची चोख अंमलबजावणी झाल्याखेरीज असे प्रकार थांबणे अवघड आहे.

**

# मध्यमवर्गीय जीवनातील महिनाअखेर....

कोकणस्पंदन

धनंजय शेट्ये



मध्यमवर्गीय जीवन नेहमीच आपल्याला दाहक वास्तवाची सतत जाणीव करून देत असतं.मध्यमवर्गीय जीवनात तुकड्या तुकड्यानी संसार सांधावा लागतो.एका महिन्यात एका पायातला जुना फाटलेला बुट शिवून घेतो न घेतो तोवर दुसऱ्या पायातला बुट फाटतो दुसऱ्या महिन्यात ऑफिस बॅगची चैन तुटलेली असते. तिला सेफ्टी पिन लावून महिना काढला जातो न जातो तोपर्यंत ट्रेनमध्ये धावपळीच्या जीवनात शर्टचा हात फाटलेला असतो.तर कधी पॅन्टचा बेल्ट तुटलेला असतो. प्रत्येक महिन्याला खर्चाचं रडगाणं पगाराआधीच हजर झालेले असते. त्यातच महागाईचा भडका उडालेला असतो. घरगुती गॅस बाराशे रुपयांच्या उंबरठ्यावर पोहोचलेला असतो.तर वर्षभर घरघर करणारा पंखा आणि फ्रीज यामुळे लाईट बिल दीड हजाराच्या घरात पोहोचललेले असते. किराणासामानाचा चढता भाव तर विचारायलाच नको! गगनाला भिडलेले भाव खाली येतच नाहीत. मध्यमवर्गीय हलाखीचे जीवन जगणारा वर्ग या सर्व गोष्टींचा सामना करीत शहरी जीवन जगत असतो. मध्यमवर्गीय जीवन अगदी पाचवीलाच पुजलेले असल्यासारखे पाठ सोडत नसतं.शालेय गुणवत्तेत मध्यम वर्गाचीच सवय झालेली असते जसे शालेय टक्केवारीत (सेकंड क्लास) ,लोकल ट्रेनचा प्रवास सेकंड क्लास.रहाणीमान मध्यमवर्गीय! मुंबईत घर घेताना कोणी विचारले तर मध्यम वर्गीय लगेच उत्तर देतो होय 'रुम' घेणार हाय, दिव्याला, नालासोपारा नाही तर वसईला!'

> **मध्यमवर्गीय माणसांचे स्वप्नही मध्यम वर्गीयच! 'रुम' 'खोली'च्या पलिकडे वैचारिक पातळीच पाऊल पुढे टाकत नाही. भव्य दिव्य स्वप्न पाहायची हिंमतच मेलेली असते. मध्यमवर्गीय हलाखीचे जीवन जगणारा वर्ग सामाजिक, सांस्कृतिक, परंपरेत माणुसकीने, सामाजिकतेने मात्र गर्भश्रीमंत असतो.**

मध्यमवर्गीय माणसांचे स्वप्नही मध्यमवर्गीयच! बंगला घेणार, फ्लॅट घेणार असे कधीच बोलणार नाही. 'रुम' 'खोली' च्या पलिकडे वैचारिक पातळीच पाऊल पुढे टाकत नाही. परिस्थितीचे अनेक चटके आणि दुर्दैवाचे फटके अवकातीत राहायला शिकवतात. भव्य दिव्य स्वप्न पाहायची हिंमतच मेलेली असते. फक्त एकच गोष्ट आनंददायी असते ती म्हणजे मध्यमवर्गीय हलाखीचे जीवन जगणारा वर्ग सामाजिक, सांस्कृतिक, परंपरेत माणुसकीने, सामाजिकतेने मात्र गर्भश्रीमंत असतो. माणुसकी जपतो, सण उत्सव, सोहळे, धार्मिक विधी,परंपरा खऱ्या अर्थाने जगतो. ऋण काढुन सण करणे हा जन्मसिद्ध हक्कच जणू!! समाज हा मध्यमवर्गीयांचा आत्मा असतो.समाजासाठी जगतो.समाजासाठी आयुष्यभर मेहनत करत असतो. नाहीतर प्राथमिक गरजांची पूर्तता तो सहज करू शकला असता. शेजारधर्म हे त्यांचे कर्तव्य असते. पाण्याच्या नळावर तावातावाने एकमेकांशी भांडणारे शेजारी शेजारी परस्परांच्या संकटात मात्र जीवाला जीव देतील. शेजारचा माणूस हॉस्पिटलमध्ये एडमिट असेल तर अख्खी चाळच जणू रात्रभर हॉस्पिटलमध्ये रात्र जागवते.

पूर्वी चाळ वस्तीत शेजारच्या घरात कोणती भाजी शिजते हे आजुबाजुला सर्वांनाच समजायची. शेजारपाळा म्हणून वाटीतून ती भाजी आजुबाजुच्या शेजारच्या घरात दिली जायची. ती वाटी परत रिकामी कधी येत नसे.साखर, चहा पावडर तर सर्रासपणे उसणे घेतली जायची.तांदूळ,पीठ ह्या वस्तू पण उसणेपणानं घेतल्या जायच्या. त्यात कधी कमीपणा वाटत नसे.कधी शंभर पाचशे रुपये उसणे घेतले जायचे पगार होताच परत केले जायचे. सर्वच मध्यमवर्गीय हलाखीचे जीवन जगणारा वर्ग त्यामुळे कमीपणा कधी वाटतं नसे.

पाहुण्यापैकी, अनोळखी माणूस जर एखाद्याच्या घरी आला तर पहिली सखोल चौकशी शेजारीच करायचे. त्यामुळे सर्व चाळच जणू एक कुटुंबच भासायचे. लहान मुलं गैरमार्गाने जाताना दिसली तर कोणताही शेजारी काका, मामाच्या नात्याने रस्त्यावरच चोप द्यायचा अशी आत्मियता, जिव्हाळा होता. अशा वेळी आईवडीलही आपलेपणाने त्या काका,मामाला हक्काने शिक्षा करायला सांगत असतं. मार जसा सामुदायिक असायचा तसा खाऊ सुद्धा सामुदायिक असायचा.आपल्याच मुलांना खाऊ नसायचा तर शेजारीपाजारी राहणाऱ्या मुलांनाही चाळीतले काका मामा खाऊ आणायचे. खऱ्या अर्थाने लक्ष्मी नांदत होती. पण आज काळ बदलला. माणसं माणुसकी विसरत चालली. आधुनिक भपकेबाजपणा माणुसकी गिळंकृत करून गेला.

**

# निवडणूक आयोगाची संवेदनशीलता? कार्यतत्परता?

आचार-विचार

डॉ. विलास पवार



महाराष्ट्रातल्या प्रत्येक टप्प्याचे मतदान झाले. मुळातच 'मत'दान करण्याची पद्धत आणि मताधिकार बजावणे यातील फरक लक्षात घ्यायला हवा. निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यावर म्हणजे आपण फक्त महाराष्ट्रातल्या पाच टप्प्यांबाबत बोलूया! अनेक वेगवेगळ्या समस्या येणे, त्रुटी येणे अभिप्रेत असणारच त्या त्रुटी आणि समस्या पुढच्या टप्प्यांवर दूर व्हाव्या या अपेक्षा असणे चुक नाहीच परंतु निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यांवर एकच गोष्ट सातत्याने झाली ती म्हणजे मतदानाचा सांख्यिकी तपशील, मतदानाची आकडेवारीला विलंब व निवडणूक आयोगाने यापूर्वी जाहीर केलेल्या सुरुवातीच्या दोन्ही टप्प्यांमधील आकडेवारी आठवडा ते दहा अकरा दिवस लागले होते ही आकडेवारी विलंबाने झाली आहे. यावर आक्षेप नोंदवला गेला. अगोदर जाहीर केलेले मतदानाची आकडेवारी आणि नंतर केलेली जाहीर संख्या वाढ नोंदवणारी होती. आक्षेप नोंदवणाऱ्या असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म (एडीआर) या स्वयंसेवी संस्थेने लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्याची ४८ तासांत आकडेवारी जाहीर करा अशी मागणी याचिकेद्वारे केली. या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात तात्काळ सुनावणीदेखील झाली. याचिकेची गंभीर दखल सर्वोच्च न्यायालयाने घेतली आणि निवडणूक आयोगाला स्पष्टीकरण देण्याचे आदेश दिले. हा विषय इतका गांभीर्याने घेतला गेला हे एकूणच महत्त्वाचे आहे.

मतदानानंतर पुढील ४८ तासांत मतदानाची अंतिम आकडेवारी निवडणूक आयोगाने संकेतस्थळावर जाहीर करावी अशी मागणी याचिकेत भरावी लागली हे दुर्देवच आहे. आपल्याकडे प्रचलित असलेली पद्धत याअगोदर मतदानाच्या संदर्भात वापरणे गरजेचे आहे. पद्धतीप्रमाणे एकूण मतदानाच्या आकड्यांची गोळाबेरीज करुन अखेरीस टक्केवारी काढली जाते. या आकडेवारीला केंद्रीय निवडणूक निरीक्षक मान्यता देतो. त्यानंतर या आकडेवारीत बदल अपेक्षित नसतो. त्या आकडेवारीत बदल होत नाही. प्रचलित पद्धतीप्रमाणे ही प्रक्रिया मतदानाच्या दुसऱ्या दिवशी पूर्ण होते. मतदानाच्या संध्याकाळी मतदारसंघातील सर्व केंद्र अधिकाऱ्यांच्या पाठविलेल्या अहवालावर जिल्हाधिकारी मतदानाची सरासरी आकडेवारी जाहीर करतात. त्यानंतर मतदानाच्या दिवशीच रात्री उशिरापर्यंत प्रत्येक मतदानकेंद्राची मतदानाची आकडेवारीची बेरीज केली जाते. ही गोळाबेरीज झाल्यानंतर अंतिम आकडेवारी काढली जाते. केंद्रीय निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यानंतर निवडणूक कर्मचाऱ्यांना घरी जाऊ दिले जाते. पूर्णपणे योग्य पद्धती असताना आता या प्रक्रियेला वेळ का लागला जातो हा प्रश्न निर्माण झाला आहे? या प्रक्रियेबाबत साशंकता निर्माण झाली आहे. यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागली! सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक यंत्रणेला फटकारणे तेव्हा सर्वसामान्यांला त्याचे समाधान आणि पर्यायाने त्याचे महत्त्व वाटणे साहजिकच आहे.

मतदानाची आकडेवारी जाहीर करण्यास विलंब लागण्याची गरज काय? हा सर्वसामान्यांच्या मनातलाच प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला विचारला होता. २४ मे पर्यंत खुलासा करण्याची वेळ आयोगावर येणे याचा विचार निवडणूक आयोगातील यंत्रणेने का केला नाही? हा सुद्धा प्रश्नच आहे. निवडणूक आयोग घटनात्मक आहे तटस्थ पक्षनिरपेक्ष आहे हे निर्विवाद सत्य असायलाच पाहिजे. परंतु सद्यस्थितीत याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. अशी शंका व्यक्त केली जात आहे.निवडणूक आयोगाने राबविलेली आचारसंहिता जाहीर केलेली मतदानाची आकडेवारी, आचारसंहितेबाबत केलेली कारवाई याबाबत भेदाभेद असू नये असेच अपेक्षित आहे. देशात अनेक घटना घडल्या ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला आहे. आचारसंहिता जाहिर झाल्यानंतर शासकीय कामे शासकीय नेमणूका याबाबत निवडणूक आयोगाचे निर्देश याबाबत याचिका कराव्या लागल्या यासर्व विषयांचा विचार केला तर निवडणूक आयोगाला अनेक प्रकारच्या आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. मतदार आणि त्यांच्याबाबत असलेल्या बाबींबद्दल जागरुकता आहे ही समाधानाची गोष्ट आहे. निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यांपर्यंत अनेक त्रुटी आणि मतदारांची भोगावी लागलेल्या हाल अपेष्टा कोठेतरी टप्प्याटप्प्याने कमी व्हायला पाहिजे होत्या. समस्या पाठपुरावा करत असतांना त्या समस्यांचे निराकरण करण्याची संवेदनशीलता निवडणूक आयोगाने दाखविणे गरजेचे होते. आपला महाराष्ट्र ग्रामीण, शहरी, दुर्गम, अतिदुर्गम अशा सर्व स्तरांवर आहे. त्यामुळे तेथे उपलब्ध करावी लागणाऱ्या सुविधा आणि गरजेच्या स्थितीची निर्मिती वेगवेगळी असणारच. पण त्यासाठी व्यवस्था करणे निवडणूक आयोगाच्या कर्तव्याचा भाग आहे. यासाठीच जिल्ह्यातील जिल्हाधिकारी सर्व यंत्रणेला कामाला लावत असतात. मग ही गैरसोय का? महाराष्ट्रातल्या शेवटच्या टप्प्यातले मतदान २० मे रोजी पार पडले. या शेवटच्या टप्प्यात पहिल्या टप्प्यात निर्माण झालेल्या प्रश्नांना पुनरावृत्ती करणारे नसावे हे अपेक्षित होते. महाराष्ट्रभर निवडणुकीचे वारे वाहायला लागले तेच मूळे उष्णतेच्या लाटीच्या साक्षीने यावर्षी तशी व्यक्तीची, पक्षाची मतदारांची मने विचलीत करणारी लाट नव्हती पण उष्णतेची लाट मात्र माणसाची कातडी जाळून पार हाडापर्यंत जाळत होती. मतदाराचा अधिकार बजावण्यासाठी हा मतदार राजा? घटनात्मक कर्तव्य करायला बाहेर तर पडला पण त्याच्या घटनात्मक अधिकाराचा संकोच झालेला आढळला. अनेक मतदान केंद्रावर लांब लांब रांगा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,मतदारांची संख्या जास्त असतांना एकच मतपेटी, संथ पद्धतीने चालणारी प्रक्रिया, उन्हापासून संरक्षण करणाऱ्या सुविधेचा अभाव, अनेक प्राथमिक सुविधेचा अभाव इ. सर्व समस्यांना निवडणूक आयोगाने आता सामोरे जाणे गरजेचे होते. निवडणूक आयोग ही कोणी एक व्यक्ती नाही. एक घटनात्मक यंत्रणा आहे. त्याचा आदर, धाक असणे गरजेचे आहे. पण हा धाक आदर सध्या सत्तेत असलेल्या पक्षांना, विरोधी पक्षांना, सर्वच राजकीय पक्षांना समान पातळीवरच असायला पाहिजे. परंतु दुर्दैवाने सत्तारुढ पक्षाच्या बाजूने दान पडते आहे असे विरोधी पक्षांकडून ओरड होत आहे, आचारसंहितेबाबत सूचना देताना तात्काळ कारवाई सत्तारुढ पक्षांच्या विनंतीवरुन केली जाते पण संबंधित विरोधकांची तक्रार आस्ते कदम या न्यायाने हाताळली जाते. घटनात्मक यंत्रणेबाबत ही अशी संशयाची सुई फिरत राहणे लोकशाहीच्या दृष्टीने घातक आहे. निवडणूक आयोग राज्यकर्त्यांना आणि राजकीय पक्षांना कसे हाताळतो हे टी.एन.शेषन सारख्या सन्माननीय निवडणूक आयुक्ताने दाखविली आहे. निवडणूक आयोग जितका शिस्तबद्ध आचरण करेल. आचार विचार ठरवेल तेवढाच मतदार देखील आत्मविश्वासाने मताधिकार बजावेल. निवडणूक आयोगाची शिस्तीची भरारी येणाऱ्या काळातच दिसून यावी एवढीच अपेक्षा!

**






# ‘शोर्मा’ ठरतोय जीवघेणा !



गेल्या काही वर्षांत जंक फूड किंवा फास्ट फूड यांविषयीची आवड लोकांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढत चालली आहे. यामध्ये तरुण वर्गाचे प्रमाण लक्षणीय आहे. शाळकरी मुलांमध्येही हल्ली जंक फूडची विशेष क्रेज दिसून येते. लोकांची वाढती आवड लक्षात घेऊन शहरासारख्या ठिकाणी प्रमुख मार्गांसह, बाजारपेठा, रेल्वे -बस स्थानके, शाळा महाविद्यालये यांसारख्या ठिकाणी जंक फूडचे स्टॉल्स मोठ्या प्रमाणात उभारले जाऊ लागले आहेत. या जंकफूडपैकीच एक असलेला ‘शोर्मा’ नावाचा मांसाहारी पदार्थ आजमितीला अनेकांच्या आवडीची डिश बनला आहे. अनेकजण तो घरी बनवण्याचाही प्रयत्न करताना दिसतात; मात्र रस्त्याच्या कडेला मिळणाऱ्या या पदार्थाची चव घरी बनवल्या जाणाऱ्या शोर्माला येत नाही असे मत खाद्य पदार्थाचे शौकीन व्यक्त करतात. तरुणांच्या जिभेचे चोचले पुरवणारा हाच शोर्मा आज अनेकांचे आरोग्य बिघडवणारा आणि काहींचे तर प्राण घेणारा ठरू लागला आहे. त्यामुळे कोणी जर हा रस्त्यालगतचा शोर्मा खात असेल तर त्यांनी सावध व्हायला हवे. मांसापासून बनवलेले पदार्थ उघड्यावर विकणे बेकायदेशीर असतानाही आज या नियमांची ठिकठिकाणी सर्रास पायमल्ली होताना दिसत आहे.

२०२२ मध्ये केरळच्या कासारगोड येथे शोर्मा खाल्ल्यामुळे ५८ जणांना विषबाधा झाली होती. त्यापैकी एका लहान मुलीचा दुर्दैवी अंत झाला होता. या शोर्माचे नमुने तपासले असता त्यामध्ये बुरशी तयार झाल्याचे लक्षात आले. या बुरशीमुळेच खाणाऱ्यांना विषबाधा झाली होती. ही घटना घडल्यानंतर तामिळनाडूचे आरोग्यमंत्री मा सुब्रमनियन यांनी लोकांना शोर्मा न खाण्याचे आवाहन केले होते; मात्र लोकांनी त्याकडे दुर्लक्ष केले.आज देशभरात हा शोर्मा शहरांसोबत ग्रामीण भागातही विकला जाऊ लागला आहे. शोर्मा हे मध्यपूर्व भागातील लोकप्रिय स्ट्रीट फूड आहे. या पदार्थाचा शोध तुर्कीमध्ये लागल्याचे मानले जाते.ओटोमन साम्राज्यादरम्यान अरब प्रदेशातील लेव्हंट प्रदेशात पहिल्यांदा शोर्मा तयार केल्याचेही मानले जाते, पारंपारिकरित्या हा पदार्थ कोकराच्या मांसापासून तयार करण्यात येत होता. कालांतराने चिकन, टर्की, गोमांस किंवा वासराचे मांस वापरण्यात येऊ लागले. भारतात विकला जाणारा शोर्मा चिकन पासून बनवला जातो असे मानले जात असले तरी यामध्ये कोणते मास वापरले जाते याबाबत कुठेही खात्री केली जात नाही. काही दिवसांपूर्वी चिकन मामोजमध्ये कुत्र्याचे मांस वापरण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यामुळे रस्त्यालगत मिळणाऱ्या शोर्मासाठी वापरण्यात येणाऱ्या मांसामध्येही अशा प्रकारची भेसळ केली जात असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२०२३ मध्ये केरळातील एका तरुणाचा शोर्मा खाल्ल्यामुळे विषबाधा होऊन मृत्यू झाला होता. मानखुर्दमध्ये हल्लीच प्रथमेश घोक्षे नावाच्या तरुणाचा रस्त्यावरील शोर्मा खाल्ल्यामुळे विषबाधा होऊन मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आनंद कांबळे आणि महंमद अहमद रेजा शेख यांना अटक करून गुन्हा नोंदवला. काही दिवसांपूर्वी गोरेगाव येथेही शोर्मातून १२ जणांना विषबाधा झाली. मांसापासून बनवल्या जाणाऱ्या शोर्मा आणि मोमोजची रस्त्यालगत सर्रासपणे अवैध विक्री केली जात आहे. असे पदार्थ आरोग्याला हानीकारक असूनही स्थानिक प्रशासनाकडून त्यांवर कारवाई होत नाही. याविषयी हिंदु जनजागृती समितीच्या सुराज्य अभियानाकडून आरोग्यमंत्री, तसेच अन्न आणि औषध प्रशासनमंत्री यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे. अशा प्रकारे उघड्यावर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी कारवाई करावी आणि त्याचा अहवाल आरोग्य विभागाला पाठवावा. यामध्ये दोषींवर कारवाई

**जगन घाणेकर**



करावी, अशी मागणी सुराज्य अभियानाचे समन्वयक अभिषेक मुरुकटे यांनी तक्रारीमध्ये केली आहे. २४ तासानंतर शोर्मा या पदार्थामध्ये मानवी प्रकृतीला हानीकारक द्रव्ये निर्माण होतात. त्यातील मांस कधीपर्यंत टिकाऊ आहे, याची कालमर्यादा देण्यात येत नाही. कालबाह्य मांस खाल्ल्यामुळे त्यातून विषबाधा होण्याची शक्यता असते. शोर्मा खातांना त्यावर ‘मेयॉनीझ’ हा पांढऱ्या रंगाचा ‘सॉस’ वापरला जातो. अंड्यातील बलक वापरला जातो. तो योग्यरित्या साठवला जातो का, याविषयी शाश्वती नसते. मोमोजमध्ये वापरण्यात येणारे ‘आजोडिकार्बोनामाईड’ आणि ‘बेझॉईल पॅरॉक्साईड’ हे शरिरासाठी हानीकारक आहे. यातून मधुमेहासारखे विकार बळावत आहेत. यासारख्या मुद्यांचा या तक्रारीमध्ये ठळकपणे उल्लेख करण्यात आला आहे. अशा प्रकारे उघड्यावर होणाऱ्या मांसाहारी खाद्यपदार्थांमुळे सामाजिक स्वास्थ्य वेठीस धरले जात आहे. त्यामुळे कुणाच्या तक्रारीची वाट न पहाता प्रशासनाने यांवर स्वत:हून कारवाई करावी, अशी मागणी मुरुकटे यांनी सुराज्य अभियानाद्वारे केली आहे. रस्त्यावरील स्टॉल्सवर खाद्यपदार्थ विकताना बऱ्याचदा स्वच्छता राखली जात नाही. मांसापासून बनवण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांच्या बाबतीत जी काळजी घेतली पाहिजे, मांस साठवण्यासाठी जी उपकरणे असायला हवीत ती रस्त्यावरील स्टॉल्सवर असतातच असे नव्हे. अशा ठिकाणी अधिक काळ मांस बाहेर राहिल्यामुळे त्यातून विषबाधा होण्याची शक्यता बळावते.

२०२२ मध्ये केरळमध्ये शोर्मा खाल्ल्यामुळे विषबाधा झाल्याची घटना घडल्यानंतर तामिळनाडूच्या आरोग्यमंत्र्यांनी खाद्यपदार्थ विकणाऱ्या राज्यभरातील स्टॉल्सची तपासणी करण्याचे आदेश दिले होते. ज्या स्टॉल्सवर अन्नपदार्थ ठेवण्यासाठी आणि साठवण्यासाठी आवश्यक सुविधा नसतील अशा १००० स्टॉल्स आणि दुकानांवर यावेळी दंडात्मक कारवाई करण्यात आली होती.

आपल्याकडे अशा प्रकारची कारवाई केव्हा होणार? शाळकरी मुले आणि तरुणांमध्ये दैनंदिन खाण्यात ‘जंक फूड’चे वाढते प्रमाण खरेतर चिंतेचा विषय आहे.‘जंक फूड’च्या अति सेवनाने शरीरातल्या इन्सुलिनची पातळी मर्यादेपेक्षा अधिक वाढते आणि व्यक्तीची प्रतिसाद देण्याची शक्ती हळूहळू मंदावू लागते. मुलांच्या बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक वाढीवर हे पदार्थ विपरीत परिणाम करतात. लहान वयातच हृदयविकार, मधुमेह, लठ्ठपणा असे विविध आजार ‘जंक फूड’च्या नियमित सेवनाने जडू शकतात. ‘हृदयविकार, मधुमेह, रक्तदाब यांसारखे आजार पूर्वी केवळ श्रीमंतांच्या घरात पाहायला मिळत आज ते सामान्यजणांच्या घरांपर्यंत पोहोचले आहेत. खाण्यातील ‘जंक फूड’चा वापर हेसुद्धा यामागील एक कारण आहे. त्यामुळे लहान मुलांसह तरुणांमधील जंक फूड्सप्रतीची क्रेज कमी करण्याची आज नितांत गरज निर्माण झाली आहे. **

## वाचनीय, प्रेरक आणि संग्राह्य

# न घेतलेला रस्ता

‘न घेतलेला रस्ता आणि इतर लेख’, हे डॉ. अजित मगदूम यांचे पुस्तक मुंबईच्या ग्रंथाली प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. या पुस्तकात एकूण अठरा लेख आहेत. या पुस्तकाचे रंगीत, समर्पक आणि देखणे मुखपृष्ठ चंद्रमोहन कुलकर्णी यांचे आहे.

‘‘न घेतलेला रस्ता’’ हा लेख रॉबर्ट फ्रॉस्ट या अमेरिकी कवीच्या ‘‘द रोड नॉट टेकन’’ या कवितेच्या, शेवटच्या सुप्रसिद्ध ओळीवर आधारलेला आहे. रॉबर्ट फ्रॉस्ट २६ मार्च १८७४ रोजी सॅन फ्रान्सिस्को येथे जन्माला आले. वयाच्या सोळाव्या वर्षापासून त्यांनी कविता लिहिल्या. वयाची अडतीस वर्षे पूर्ण झाली तरी त्यांना कवी म्हणून कोणी ओळखत नव्हते. १९४९ साली ‘कम्प्लीट पोएम्स’ प्रसिद्ध होईपर्यंत त्यांचे डझनभर काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले होते. त्यापैकी चार संग्रहांना पुलित्झर पुरस्कार प्राप्त झाले. फ्रॉस्ट सातत्याने साहित्य विश्वात झळकत राहिले. त्यांना सर्व प्रकारच्या लोकांपर्यंत कवितेद्वारे पोहोचायचे होते. शेतात रमणारा हा कवी होता. २९ जानेवारी १९६३ रोजी फ्रॉस्ट यांचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांचे चरित्र, तीन खंडात प्रसिद्ध झाले. ऑगस्ट, १९१५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ‘‘द रोड नॉट टेकन’’ या वीस ओळींच्या कवितेला शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने जगभर या कवितेची सखोल आणि मर्मग्राही चिकित्सा केली गेली. त्याचा उत्तम आढावा या शीर्षकलेखात अजित यांनी घेतला आहे. ही कविता म्हणजे कोणतेही निर्णयन न करणाऱ्या निवडीच्या स्वायत्ततेचे एक सुंदर रेखाचित्र आहे.



**पुस्तक परिक्षण**
**प्रा.शाम जोगळेकर**
**मो. ९२७३३४३१७७**

‘‘विश्वातील द्वंद्व चितारणारा लेखक : काझुआ इशिगुरो’’ या लेखात २०१७ मधील साहित्याच्या नोबेल पुरस्कार विजेत्याच्या जीवनाची आणि साहित्याची ओळख अजित यांनी मराठी वाचकांना उत्तम प्रकारे करून दिली आहे. इशिगुरो कुटुंब नागासाकीहून इंग्लंडला १९६०साली स्थलांतरित झाले. तेव्हा काझुओ पाच वर्षांचा होता. इशिगुरोने आठ कादंबऱ्या लिहिल्या. इशिगुरोने आपल्या आंतरराष्ट्रीय आशयाच्या कादंबऱ्यांतून अशी जीवनदृष्टी मांडली की, जी जगातील विविध पार्श्वभूमीच्या लोकांना प्रेरक ठरेल. ‘‘सिलव्हिया प्लॅथची पत्रं : पुन्हा एक वादळ’’ या लेखात फक्त तीस वर्षांचे आयुष्य (१९३२-१९६२) लाभलेल्या कवयित्रीच्या जीवनाविषयी समजते. तिचे जीवन, काव्य आणि २०१७ साली प्रकाशित झालेले तिची पत्रे, यामुळे निर्माण झालेले वादळ यांची माहिती अजित यांनी उत्तम प्रकारे वाचकांसमोर मांडली आहे. २३ एप्रिल २०१६ रोजी ५२ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या शेक्सपिअरच्या मृत्यूला चारशे वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने जगभर, वर्षभर विविध साहित्यिक कार्यक्रम झाले. शेक्सपियअर : एकमेवाद्वितीय, या लेखात या निमित्ताने अजित यांनी या महान जगप्रसिद्ध साहित्यिकाच्या जीवनाचा आणि साहित्याचा आढावा उत्तम प्रकारे घेतला आहे. ओल्गा तोकरझुक : सरहद्दी ओलांडणाऱ्या प्रवासाचं तत्त्वज्ञान मांडणारी नोबेल विजेती लेखिका, या लेखात २९ जानेवारी १९६२ रोजी पोलंडमध्ये जन्मलेल्या, २०१८ सालचा साहित्यातील नोबेल पुरस्कार विजेत्या लेखिकेच्या जीवनाची आणि साहित्याची ओळख करून दिली आहे.

‘‘शासनसंस्था किती स्त्री-स्नेही?’’ या लेखात लेखकाने भारतातील शासन संस्था स्त्री-स्नेही नसल्याचे सुरुवातीलाच स्पष्ट करून,लिंगभेदामुळे निर्माण होणाऱ्या विविध प्रश्नांची सविस्तर चर्चा केली आहे. स्त्रीवाद सर्वसमावेशक का नाही? या लेखात ज्यून एरिक-उदोरी या लेखिकेने लिहिलेल्या ‘‘आपण सर्वच स्त्रीवादी होऊ शकू का?’’ या इंग्रजी पुस्तकाला लिहिलेल्या प्रदीर्घ प्रस्तावनेचा अनुवाद वाचावयास मिळतो. त्यामधून स्त्रीवादाचे विविध पैलू वाचकासमोर उलगडतात. १९९० साली रियाधमध्ये काही स्त्रियांनी ड्रायव्हिंगच्या हक्कासाठी आंदोलन सुरू केले. २०११ साली मनाल-अल-शरीफ या उच्चशिक्षित सौदी अरेबियातील महिलेने विविध माध्यमांमार्फत हा लढा तीव्र केला आणि तिला त्यात यश प्राप्त झाले. टाइम मॅगझिनने तिची २०१२ मधील एक प्रभावी व्यक्ती म्हणून निवड केली. त्यावेळी व्यक्त केलेल्या तिच्या मनोगताचा अनुवाद ‘‘कोणती लढाई अधिक कठीण?’’ या लेखात वाचावयास मिळतो. समान हक्क मिळविण्यासाठी जगभरातील स्त्रियांना कोणत्या संघर्षांना आणि त्यासाठी शासन आणि समाजाच्या विरोधाला कसे तोंड द्यावे लागते याची त्याद्वारे कल्पना येते. गांधीजी आणि अहिंसा, या लेखात महात्मा गांधी यांच्या अहिंसेच्या संकल्पनेची सविस्तर चर्चा केली आहे. सत्य आणि अहिंसा यांच्या आधारे त्यांनी सर्वसामान्यांचा भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग प्राप्त केला. गांधीजी आपल्या तत्त्वांशी जीवनाच्या अखेरीपर्यंत अढळ राहिले. त्यामुळेच गांधीजींचे माहात्म्य जगाला समजले. म्हणूनच २००७ सालापासून संयुक्त राष्ट्रांनी गांधी जयंतीचा, २ ऑक्टोबर हा दिवस ‘‘आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन’’ म्हणून जगभर साजरा केला जातो. अण्णाभाऊ साठे यांच्यावरील लेखात लेखकाने त्यांच्या जीवनाचा आणि साहित्याचा उत्तम परामर्ष घेतला आहे. त्यांच्या साहित्याने प्रस्थापित साहित्याला हादरवले. त्यामुळेच दलित साहित्याला प्रोत्साहन मिळाले. पिढीतलं अंतर वाढता वाढे..., आई आणि पत्नी : एक चिरंतन गुंता, व्हॉट्स् ॲप,व्हॉट्स ॲप, ... तर माणूसपण उजागर होईल, शिफ्टिंग हे ललित लेख सर्वांनाच, विशेषत: ज्येष्ठ नागरिकांना अंतर्मुख करणारे झाले आहेत. ‘‘दुस्तर हा घाट संवादाचा’’ हा लेख माहितीपूर्ण आणि सर्वांना उपयुक्त ठरणारा आहे. श्रवणशक्तीचे महत्त्व त्यामधून स्पष्ट होते. ‘‘नात : चैतन्यदायी नातं’’ हा स्वानुभवावर आधारित लेख नितांत वाचनीय आहे. लहान मुले मोठ्यांना नकळतपणे कसे शिकवून जातात, हे लेखकाने उत्तम प्रकारे मांडले आहे. सॅन फ्रान्सिस्को शहराची ओळख करून देणारा लेख वाचनीय झाला आहे. शेवटी लेखकाचा सविस्तर परिचय दिला आहे. मलपृष्ठावर अजित मगदूम यांच्या रंगीत छायाचित्रासह त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये मांडली आहेत. हे पुस्तक नितांत वाचनीय, प्रेरक आणि संग्राह्य झाले आहे. **

**पुस्तकाचे नाव : न घेतलेला रस्ता**
**लेखक : डॉ.अजित मगदूम ७५०६०६७७०९**
**प्रकाशक : ग्रंथाली, माटुंगा , मुंबई -१६ पहिली आवृत्ती : २५ डिसेंबर २०२३**
**पृष्ठे : १४६ मूल्य : रुपये : २५०/-**

# माझ्या आडनावाची कसरत

हॅलो ! हंबोला ! मी मुद्देबिहाळकर बोलतोय! काय!! त्रासिक स्वरात. अहो मी मुद्देबिहाळकर बोलतोय ! मी पुन्हा सांगतो. काय,म्हणालात? पलीकडच्या माणसाला काहीही कळलेलं नसतं. अखेर तो जो कोणी असतो तो फोन दणकन आदळल्याचा मला आवाज येतो. हे लॅन्डलाईन असल्यापासून चालू आहे. आता स्मार्टफोन आले तरी तेच. आदळल्याचा आवाज नाही आला तरी फोन रागाने कट केल्याचं समजतंच. आता मी हे गेली,जेवढी वर्षे मला झाली तेवढी कळती वर्षे भोगत आहेच.तेच माझ्या भावांचं,मुलांचं आणि आता नातवाचंही होतंय याची मला चांगलीच कल्पना आहे. एकदा सांगून माझं आडनाव समजतच नाही त्याला मी तरी काय,करणार? कशी छान, छोटी आडनावं असतात बघा जोशी, देशमुख, सोमण, देशपांडे, कुलकर्णी काही गावाच्या नावावरून असतात. वाईकर, पेणकर ही आडनावं ज्यांना लाभली ती कुटुंबे खरंच भाग्यवान. बरं छोटीशीच नसली तरी सोपी,सुटसुटीत आडनावं उच्चारायला, हाक मारायला बरी पडतात. आमच्या पूर्वजांनी आमचं हे लांबलचक आडनाव घेऊन काय,साधलं समजत नाही. खरंतर ना आडनावात जोडाक्षर नसावं असं मला वाटतं, आता मुद्दे मध्ये द वर द, आणि वर मात्रा,पाहिजेच कशाला ? त्यामुळे जास्त घोळ होतो, आडनाव सांगताना या ददे मुळेच, काय म्हणालात असा प्रश्न निर्माण झाल्यास नवल नाही. शाळेत असताना कोणी मला नुसतं मुद्देच, हाक मारायचं. ऑफिसात अजून बिहाळकर असं हाक मारणारी मंडळी आहेत. कुठल्याही संगणकीय फॉर्मातील चौकोनात माझं आडनाव मावत नाही. ते चौकोनाबाहेर जातंच. बरं याची निर्मिती कशी झाली तर, मुददेबिहाळ म्हणे एका गावाचे नाव आहे. ते कुठेतरी कर्नाटक राज्यात आहे. ते मीच काय, माझ्या आईवडिलांनाही पाहिलेले नाही. तेथील,म्हणे आम्ही खोत ! म्हणजे पाटील म्हणून आम्हाला हे आडनाव चिकटलं. फक्त एवढंच झालं, माझे वडील महाराष्ट्रात आले आणि मुददेबिहाळ पुढे आणखीन दोन अक्षरे वाढली ‘कर’ हे लागलं.

**शशिकांत मुद्देबिहाळकर**
**९७६७१५२६०८**

जोशीचे जोश्या होतं तसं मुद्देच मुद्द्या झालंच. तरी आमच्या तीन पिढ्यांचा मुक्त वावर रायगड जिल्ह्यात असल्याने बऱ्यापैकी लोकांच्या तोंडी हे नांव आता नवीन राहिलेलं नाही. रुळलंय, त्याला कारण माझं लेखन असेल,किंवा आमचा वावर असेल. आता आम्ही इथलेच वाटतो कारण अंग कांतीतील गोरेपण, स्वच्छ मराठीत बोलणं. हे पुणेरीपण, आता परकेपण नामशेष झालंय. आता फोन केल्यावर ‘काय’? असला त्रासिक प्रश्न सहसा येत नाही.तरी तो येतच नाही असं मात्र नव्हे. मी तर म्हणेन की आडनावं हवीतच कशाला? सुभाष, हेमंत, रवी, दिपक, अमित, आनंद एवढंच पुरेसं आहे की! त्यावरून जात समजत नाही,की परकेपण लक्षात येत नाही. कुलोधदार हवा कशाला? ईथे आहेत तरी कुठे कुलदीपक? आणि कुलदीपिका ? आणि असतील तर त्यांचं नाव ते राखतील. तरी लाडानं सुभाषचं शुभया, रवीचं रव्या, शशीचं शश्या हे होणारच. त्यात आपलेपण आहे, आणि गोडीही आहे.

ही माझ्या आडनावाची कसरत सुफळ संपूर्ण. **

# सृष्टी जगेल तरच आपण जगू

झाडांनीही पापच केलेले असते असं जर कोणी म्हटलं तर आपल्याला आश्चर्यच वाटेल. कारण झाडाबद्दल आपल्या भावनाच मरण पावलेल्या आहेत. परंतु झाडांनीही दाखवून दिले की आम्ही किती उपयोगाचे आहोत. आम्ही जर नसलो तर या पृथ्वीतलावर पाणी पडू शकणार नाही. तापमानही वाढेल व सृष्टी नष्ट होईल. याबाबतीत एक कथा आहे. प्राचीन काळात राजे पद्धती अस्तित्वात होती. त्यात सैनिक एकमेकांशी लढत व ते एकमेकाना मारत असत. ते पापच होत असे. कारण एकमेकांचा विनाकारण जीव घेणे हे पापच होते.

सैनिक हे आपल्या धन्यासाठी लढत. प्रसंगी आपल्या धन्यासाठी ते परकीय शत्रू सैन्याचा बळी घेत. यात दोष त्यांचा नसायचा. तो दोष राजाचा असायचा. ते बिचारे आपल्या पोटासाठी राजाकडे नोकरी करीत व आपल्या पोटासाठी ते आपला जीवही देत आणि जीवही घेत असत. परंतु त्याचा दोष राजाला लागत नसे. जेव्हा पापाची शिक्षा द्यायची वेळ यायची.

ते सैनिक जेव्हा मरत असत आणि त्यानंतर ते यमनगरीत जात. तेव्हा न्यायिक देवता यम त्यांना शिक्षा सुनावीत असतांना फार कठीण शिक्षा देत असे. तेव्हा राजा म्हणत असे की दोष माझा कसला, मी तर कर्तव्य केलं. मग राजानं तसं म्हणताच यम न्यायिक भावनेतून सैनिकांनाच दोष देत त्यांना भयंकर मोठ्यात मोठ्या शिक्षा देत असे आणि राजाचा दोष असूनही त्यांना हलक्या दर्जाच्या शिक्षा.

एकदाचा तो प्रसंग. त्यावेळेस सर्व सैनिक एका जत्थ्यानं न्यायिक देवता यमाकडे गेले. म्हणाले, ‘‘यम महाशय, आम्ही आमच्या पोटासाठी सैनिक म्हणून लढतो. स्वतः प्राण देतो आणि आमच्याच भरवशावर राजाची चांदी चांदी होते. त्यात आम्हाला काहीच फायदा होत नाही. उलट दोष आमचाच दिसतो राजा आमच्याचमुळे विलासात जगतो. आम्ही जर नसतो तर राजाला विलासात जगता आलंच नसतं. परंतु आम्हाला हे मान्य की दोष आमचाच असतो. परंतु आम्हाला अशी शिक्षा द्या की आमच्या दोषाचं क्षालन होईल व आम्ही शिक्षा तर भोगू. परंतु त्या शिक्षेनंतर दोषमुक्त होवू.’’

त्या मृत सैनिकांचं ते बोलणं. त्यांनी आपापल्या वेदना मांडल्या होत्या यमदेवतेसमोर. त्यावर यमदेवता विचार करु लागली. विचार करु लागली की यावर काही उपाय तरी निघू शकेल काय?

**अंकुश शिंगाडे**

विचारांती यमदेवतेला आठवलं की आपण या सर्व सैनिकांना झाडं बनवू. ही मंडळी झाडं जर बनली तर यांचा दोष असल्यानं यांना सुर्याचं कडक उन्हाचे चटके शोषावे लागेल. पळून जायची इच्छा जरी असली तरी ते कडेला पळून जावू शकणार नाहीत. शिवाय यांनी ज्यांना ज्यांना ठार केलं. ते सर्वजण यांचे अवयव छाटतील व यांना अमानुष वेदना देतील. ज्यातून यांना भयंकर त्रास होईल. त्यानंतर राजाकडे विचारांती वळून यमदेवतेनं विचार केला की राजानं एक राजा असल्यानं आपलं कर्तव्य जरी केलं असेल, तरी तोही दोषी आहे. त्यानं औषधीचं झाड बनावं. ज्या झाडाच्या खाली लोकं दिवे लावतील. दिव्यातील जास्तीचे भेसळयुक्त तेल जमीनीत जावून झाडांच्या मुळांना व्यवस्थीत पूरक खाद्य मिळणार नाही व ते मरतील.

यमदेवतेनं तसा विचार करताच तथास्तू म्हटलं व सर्व सैनिक तेव्हापासूनच झाडं बनली व राजे हे औषधी झाडं. त्यानंतर ते दोषमुक्त होईपर्यंत सुर्याच्या तप्त उन्हात ऊन झेलत असतात आणि आपल्याला सावली देवून आपली सेवा करीत असतात नव्हे तर आपली सेवा करुन दोषमुक्त होत असतात. ते आपली सावली देवून सेवा करतात. तरीही आपण त्यांना चांगलं वागवत नाही. आपण त्यांच्या फांद्यारुपी अवयव मोडून त्यांना अतिशय वेदना देतच असतो. काही तर त्यांना कुऱ्हाडीनं तोडून त्यांची निर्मम हत्या करीत असतात. तेव्हा त्यांना अतिशय भीतीही वाटत असते. परंतु ते घाबरुन पळूही शकत नाहीत. काही दिवसानं झाडं नष्ट होतात. ते नष्ट झाले की आपल्या पापरुपी दोषातून मुक्त होतात. तेव्हापर्यंत त्यांची घाबरुन पळून जायची इच्छा जरी असली तरी ते पळून जावू शकत नाहीत. दोषमुक्त होईपर्यंत.



काल सतत युद्ध होत असत. त्यामुळंच जास्तीत जास्त सैनिक मरत असत. त्यामुळंच झाडं जास्त होती. जंगलंची जंगलं होती व वातावरणात ऑक्सिजनची मात्रा जास्त होती. परंतु आज तसं नाही. आज युद्ध होत नाहीत. म्हणूनच झाडंही कमी होत आहेत. त्यामुळंच पर्यावरण ढासळत चालले आहे.

महत्वाचं सांगायचं झाल्यास आजचे लोकं याच दंतकथेच्या अनुषंगानं चालतात व मानतात की सैनिकच मरत नाहीत. मग झाडं कुठून असणार. परंतु महत्वपूर्ण गोष्ट ही की ही दंतकथा आहे. या दंतकथेचा आणि झाडं लावण्याचा दूरदूरचा संबंध नाही. झाडं ही अतिशय महत्वाची गरज आहे. त्याच्यापासून बरेच फायदे आहेत. ते सावली देतात. जमिनीची धूप जास्त होवू देत नाही. पर्यावरण संतुलन राखता येतं. झाडं फळ फुल देतात, लाख व डिंक देतात औषध्या देतात. सरपणही देतात. इमारती लाकूडही देतात. तशीच झाडं ही पाऊसही देत असतात. झाडं ही ऑक्सिजन देतात. ऑक्सिजन हवेत प्रवाहीत करतात. तो ऑक्सिजन हवेत वर वर जात असतो. तो ऑक्सिजन वर गेल्यानंतर त्याचा संपर्क हायड्रोजनशी येतो व पाऊस पडतो. कारण हायड्रोजन हा हवेतील एक घटक आहे व तो हलका वायू असल्यानं पृथ्वीच्या कक्षेत नसतो. तो हवेच्या वरच्या भागात असतो. जेव्हा ऑक्सिजनवर जावून हायड्रोजनच्या संपर्कात येतो. तेव्हा पाऊस पडतो. परंतु, हे जरी खरं असलं तरी मुख्य बाब ही की हवेत जास्तीत जास्त ऑक्सिजन प्रवाहीत व्हायला हवं. तेव्हाच पाऊस येणार. नाहीतर नाही. मग त्यासाठी पृथ्वीतलावर जास्तीत जास्त झाडं लावायला हवीत हेही तेवढंच खरं. विशेष बाब ही की झाडं आपण लावायला हवीत. ते आपल्या हातात आहे. मग सैनिक शहीद होवो की न होवो. त्या गोष्टीशी आपला संबंध नाही. मात्र झाडं लावणं आपल्या हातात आहे. त्यामुळंच प्रत्येकानं एकतरी नाही तर दोनतरी झाडं लावलीच पाहिजेत. लावायलाच पाहिजेत. जेणेकरुन तापमान वाढणार नाही व सृष्टी जगेल. सृष्टी जगेल तरच, आपण जगू. नाहीतर सृष्टीसोबत आपणही काळाच्या ओघात केव्हा संपून जावू. ते आपल्याला कळणारही नाही. हेही तेवढंच खरं. **

# सनरायझर्स हैदराबाद ६ वर्षांनंतर फायनलमध्ये

। मुंबई । वृत्तसंस्था।

आयपीएल २०२४ मधील दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्सचा ३६ धावांनी पराभव करत ६ वर्षांनी फायनलमध्ये धडक मारली आहे. आता २६ मे रोजी कोलकाता आणि हैदराबाद विजेतेपदाच्या लढतीत आमनेसामने असतील. चेपॉक स्टेडियवर झालेल्या या सामन्यात हैदराबादने प्रथम खेळताना हेनरिक क्लासेनने अर्धशतकाच्या जोरावर १७५ धावा करत सन्मानजनक धावसंख्या उभारली. त्यानंतर हैदराबादने शाहबाज अहमदच्या शानदार गोलंदाजीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सला १३९ धावांवर रोखत विजयावर शिक्कामोर्तब केले.

राजस्थान रॉयल्स संघ लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला, तेव्हा यशस्वी जैस्वाल आणि ध्रुव जुरेल व्यतिरिक्त संघाची संपूर्ण फलंदाजी झुंजताना दिसली. जैस्वालने २१ चेंडूत ४२ धावा केल्या आणि या खेळीत त्याने ४ चौकार आणि ३ षटकार मारले. त्याबरोबर ध्रुव जुरेलने ३५ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकार मारत नाबाद ५६ धावांची खेळी साकारली. विशेषत: शाहबाज अहमदने मधल्या षटकांमध्ये ३ महत्त्वाचे बळी घेत सामन्याची दिशाच बदलून टाकली. ज्यामुळे सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्सचा पराभव करून आयपीएल २०२४ हंगामाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. रविवारी हैदराबादचा सामना कोलकाता नाइट रायडर्सशी होणार आहे.



### फिरकी गोलंदाज ठरले मॅचविनर

#### अभिषेकची कामगिरी

या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा खेळाडू अभिषेक शर्माने ५ चेंडूत १२ धावा केल्या आणि हैदराबादच्या डावाच्या पहिल्याच षटकात तो बाद झाला. पण राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या सामन्यात त्याने एक-दोन नव्हे तर चार षटके टाकली. अभिषेकने ४ षटकात अवघ्या २४ धावा देत दोन महत्त्वाचे बळी घेतले. प्रथम त्याने संजू सॅमसनला १० धावांवर एडन मार्करमकडे झेलबाद केले आणि त्यानंतर अवघ्या ४ धावांवर शिमरॉन हेटमायरला बोल्ड केले. अभिषेकची बॅट न तळपता त्याचा चेंडू तळपल्याचे दिसून आले आहे.

#### शाहबाजने तीन विकेट घेतल्याने राजस्थानचा डाव फसला

क्वालिफायर-एक सामन्यात केकेआरनने हैदराबादचा पराभव केला होता. आता पुन्हा एकदा दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. राजस्थानने एलिमिनेटरमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला पराभूत करून अंतिम फेरी गाठण्याचा पहिला अडथळा पार केला होता, परंतु विजेतेपदाच्या सामन्यात प्रवेश करण्यापूर्वी संघाला शेवटचा अडथळा पार करता आला नाही आणि त्याचा प्रवास येथेच संपला. राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसनने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, परंतु हैदराबादने खराब सुरुवातीनंतर सावरत आणि हेनरिक क्लासेनच्या ३४ चेंडूत ५० धावांच्या जोरावर २० षटकांत ९ गडी गमावून १७५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात यशस्वी जयस्वालने राजस्थानला चांगली सुरुवात करून दिली, मात्र तो बाद झाल्यानंतर संघाची लय विस्कळीत झाली. ध्रुव जुरेलने अर्धशतक झळकावून संघाला सामन्यात टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला असला, तरी आवश्यक धावगती इतकी जास्त होती की जुरेलचे प्रयत्नही कामी येऊ शकले नाहीत. राजस्थानने २० षटकांत ७ गडी गमावून १३९ धावा केल्या. हैदराबादसाठी प्रभावी खेळाडू म्हणून आलेला फिरकीपटू शाहबाज अहमदने उत्कृष्ट गोलंदाजी केली. शाहबाजने ३ विकेट घेतल्याने राजस्थानचा डाव फसला.

# सिंधूने केला युईचा पराभव

। क्वालालंपूर । वृत्तसंस्था ।

ऑलिंपिक तोंडावर येत असताना पी. व्ही. सिंधूला सूर सापडत असल्याची चिन्हे दिसत आहेत. मलेशिया मास्टर्स स्पर्धेतील सामन्यात तिने अव्वल मानांकित चीनच्या हॅन युई हिचा पराभव केला आणि उपांत्य फेरी गाठली. आता उपांत्य सामन्यात सिंधूचा सामना इंडोनेशियाची पूर्ती कुसुमा वर्दानी किंवा थायलंडच्या बुसानान ओंगबमरुंगफन यांच्यातील विजेतीशी होईल.



सध्या जागतिक क्रमवारीत पाचव्या क्रमांकावर असलेल्या सिंधूला मात्र सलग दुसऱ्या

सामन्यात तीन गेमपर्यंत लढावे लागले. या सामन्यात तिने हॅनचा २१-१३, १४-२१, २१-१२ असा ५५ मिनिटांच्या लढतीत पराभव केला. हॅन हिचे जागतिक क्रमवारीतील स्थान सिंधूनंतरचे आहे. सिंधूचे हॅनवर वर्चस्व राहिलेले आहे; परंतु गेल्या महिन्यात झालेल्या आशिया बॅडमिंटन स्पर्धेत हॅनने सिंधूचा पराभव केला होता. त्या पराभवाची सिंधूने परतफेड केली आहे. अन्य सामन्यात भारताच्या अश्मिती छलिहा हिची वाटचाल उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आली. सहाव्या मानांकित चीनच्या झेंग यू मिन हिने अश्मिताचा २१-१०, २१-१५ असा पराभव केला. सिंधूने आपली अखेरची स्पर्धा सिंगापूर ओपन २०२२ मध्ये जिंकलेली आहे. सामन्यातील पहिल्या गेममध्ये तिने ३-३ अशा बरोबरीनंतर ११-५ अशी आघाडी घेतली. चीनच्या या प्रतिस्पर्धी खेळाडूने हळूहळू सिंधूचा पाठलाग केला. पिछाडी १३-१६ अशी कमी केली; परंतु पुढील सलग पाच गुण मिळवत सिंधूने पहिला गेम जिंकला. पहिल्या गेमनंतर सिंधूने निर्णायक गेममध्ये स्वतःला सावरले. बघता बघता ११-३ अशी आघाडी घेतली आणि त्यानंतर तिने मागे वळून पाहिले नाही.

# वामिकाच्या नावाला आठ कोटींची मागणी

। मुंबई । वृत्तसंस्था ।

विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांची जोडी नेहमी चाहत्यांचे लक्ष वेधून घेत असते. विराट कोहली, अनुष्का शर्मा यांच्याप्रमाणे त्यांची मुलगी वामिका वयाच्या तिसऱ्या वर्षीच प्रसिद्ध झाली आहे. त्यामुळे वामिकाच्या नावाला इंटरनेटच्या जगात प्रचंड मागणी आली आहे. वामिका डोमेन नेम इंटरनेटवर आठ कोटींपेक्षा जास्त रुपयांना मागितले जात आहे.



#### वामिका कोहलीच्या नावाला पसंती

विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांची मुलगी वामिका हिचा जन्म ११ जानेवारी २०२१ रोजी झाला. वामिका या नावाचा अर्थ आई दुर्गाचे स्वरुप आहे. विराट कोहलीने मुलीचे नाव वामिका ठेवल्यानंतर ते चांगलेच चर्चेत आले. डोमेन नेम देणारी वेब होस्टिंग कंपनीकडे वामिका कोहलीच्या नावाला प्रचंड मागणी आली आहे. जर कोणाला हे डोमेन नेम हवे असेल, तर त्याला त्यासाठी ८ कोटींपेक्षा जास्त रक्कम द्यावी लागणार आहे. अमेरिकन डॉलरमध्ये ही रक्कम १ मिलियन डॉलरपेक्षा जास्त आहे.

# गावस्करांनी राजस्थानच्या ‘या’ खेळाडूला झापलं

। मुंबई । वृत्तसंस्था ।

२०२४ मध्ये क्वालिफायरचा दुसरा सामना झाला. या सामन्यामध्ये सनरायझर्स हैदराबादने सरस खेळ दाखवत राजस्थान रॉयल्सला पराभूत केले. या पराभवामुळे राजस्थान रॉयल्सच स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले आहे. या वेळी सुनील गावस्कर यांनी राजस्थानच्या एका फलंदाजांवर परखड शब्दात टीका केली.

२०२४ च्या दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्सचा पराभव केला. या हारमुळे राजस्थान रॉयल्सला आपल्या दुसऱ्या जेतेपदासाठी आणखी प्रतिक्षा करावी लागणार आहे. दोन वर्षांपूर्वी संजू सॅमसनच्या नेतृत्वाखाली राजस्थानची टीम फायनलमध्ये पोहोचली होती. पण हार्दिक पांड्याच्या गुजरात टायटन्सने त्यांना पराभूत केले. २०२३ मध्ये थोडक्यात त्यांची प्लेऑफची संधी हुकली. महत्त्वाच्या सामन्यात राजस्थानची फलंदाजांची फळी कोसळली. दव पडला नाही. त्याचा शाहबाज अहमद आणि अभिषेक शर्मा या स्पिनर्सनी फायदा उचलला. या दोघांची गोलंदाजी खेळताना राजस्थान रॉयल्सचा डाव गडगडला. फॉर्ममध्ये असलेला रियान पराग लवकर बाद झाला. हा राजस्थानसाठी मोठा झटका होता. १७६ धावांच्या टार्गेटचा पाठलाग करताना ८.३ ओव्हर्सनंतर राजस्थानची स्थिती ६७-३ होती. शाहबाज आणि अभिषेकची गोलंदाजी सुरु झाल्यानंतर राजस्थानचा डाव आणखी अडचणीत सापडला. २२ चेंडूत राजस्थानला एक बाऊंड्री मारता आली नाही. त्यामुळे फलंदाजांवर दबाव वाढत गेला. रियान पराग ९ चेंडूत ६ धावांवर खेळत होता. त्याने शाहबाज अहमदच्या गोलंदाजीवर हल्ला चढवला. शाहबाजने त्याआधी नऊ सामन्यात एकही विकेट घेतली नव्हती.



#### सुनील गावस्कर काय बोलले?


“तुम्ही जर विचारच करणार नसाल, तर अशा टॅलेंटचा काय उपयोग? हा कुठल्या प्रकारचा शॉट होता?” गावस्कर ऑन एअर हे बोलले. त्यांच्या शब्दातून संताप व्यक्त झाला. “तुमच्याकडे टॅलेंट असेल, पण परिस्थितीनुसार खेळता येत नसेल, तर उपयोग होणार नाही. तुम्ही काही निर्धाव चेंडू खेळले म्हणून काय झालं?” अशा शब्दात सुनील गावस्करांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# पाऊस पडल्यास ट्रॉफी कोणाची

। चेन्नई । वृत्तसंस्था ।

आयपीएल २०२४ चा अंतिम सामना हैदराबाद आणि कोलकाता यांच्यात होणार आहे. या सामन्याची चाहत्यांमध्ये प्रचंड क्रेझ पाहायला मिळत आहे. हा सामना चेपॉक स्टेडियम चेन्नई येथे खेळला जाणार आहे. अशा परिस्थितीत चाहत्यांमध्ये याबाबत क्रेझ तर आहेच, सोबतच पावसामुळे हा सामना रद्द झाला तर अंतिम ट्रॉफी कोणाच्या नावावर होणार, अशी भीतीही चाहत्यांना सतावत आहे.

कोलकाताने क्वालिफायर एक मध्ये सनरायझर्स हैदराबादचा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. गुणतालिकेतही कोलकाता अव्वल स्थानावर होता आणि अंतिम फेरी गाठणारा पहिला संघ ठरला. आता हैदराबादनेही अंतिम फेरी गाठली आहे. अशा स्थितीत केकेआरला पुन्हा एकदा हैदराबादचा सामना करावा लागणार आहे. विशेष म्हणजे केकेआरचा हैदराबादविरुद्धचा विक्रम अतिशय उत्कृष्ट आहे. आयपीएल २०२२४ ची फायनल पावसामुळे रद्द झाली, तर केकेआर हा विजेता संघ मानला जाईल. कारण कोलकाता आयपीएल २०२४ च्या पॉइंट टेबलमध्ये सर्वात वर आहे.



आयपीएल २०२४ च्या अंतिम सामन्यात पाऊस पडला आणि सामना खेळता आला नाही, तर त्यासाठी राखीव दिवस ठेवण्यात आला आहे. राखीव दिवशी पाऊस पडला तरी पंच कसा तरी सामना ५-५ षटकांचा करण्याचा प्रयत्न करतील. जर ५ षटकांचा सामनाही शक्य नसेल, तर किमान सुपर ओव्हर करण्याचा प्रयत्न केला जाईल, परंतु समजा दोन्ही दिवशी मुसळधार पाऊस पडला आणि सामना रद्द झाला, तर अशा परिस्थितीत कोलकाता जिंकेल. गुणतालिकेत वरच्या स्थानावर असण्याचा फायदा कोलकाताला मिळेल आणि तो ट्रॉफी जिंकेल. केकेआरची ही तिसरी ट्रॉफी असेल.

# भारतीय प्रशिक्षकपद नकोरे बाबा...

। मुंबई । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट संघाच्या नवीन मुख्य प्रशिक्षकासाठी अनेक नावे पुढे येत आहेत. रिकी पॉंटिंग, जस्टीन लँगर आणि ॲन्डी फ्लॉवर या तीन दिग्गजांनी भारतीय प्रशिक्षकपदासाठी नकार दिला आहे. २९ मे अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने आता फक्त ५ दिवस शिल्लक राहिले आहेत.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने वरिष्ठ पुरुष भारतीय क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकासाठी अर्ज आमंत्रित केले आहेत. सध्या राहुल द्रविड भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक आहेत. द्रविड यांचा कार्यकाळ जूनमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषक २०२४ नंतर संपणार आहे. भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदासाठी अर्ज करण्याचा आपला कुठलाही विचार नाही, असे बंगळुरुचे प्रशिक्षक ॲन्डी फ्लॉवर यांनी सांगितले. मी अर्ज केला नाही आणि करणार देखील नाही. राष्ट्रीय संघासाठी वर्षातील दहा महिने काम करण्याची आपली इच्छा नाही.
सध्या मी माझ्या कामात व्यस्त आहे, असे ॲन्डी फ्लॉवरने सांगितले. रिकी पॉंटिंग यांनीही भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक बनण्याचा प्रस्ताव धुडकावला. माझी जीवनशैली फिट नाही, असे त्यांनी कारण दिले. राष्ट्रीय संघाचा वरिष्ठ कोच बनणे पसंत आहे.
मात्र, आयुष्यात अनेक गोष्टी करायच्या असून, घरीदेखील वेळ देऊ इच्छितो. भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षकपद ही क्रिकेट विश्वातील बहुधा सर्वात मोठी जबाबदारी आहे. हे एक मोठे आव्हान असेल. परंतु या सर्व गोष्टींसोबतच वेळही योग्य असायला हवी. असे लँगर यांनी सांगितले.

# विजेत्या, उपविजेत्यांवर पडणार पैशांचा पाऊस

**मुंबई** : आयपीएल २०२४ च्या हंगामातील अंतिम सामना २६ मे (रविवार) रोजी सनरायझर्स हैदराबाद आणि कोलकाता नाइट रायडर्स यांच्यात चेन्नई येथे खेळवला जाणार आहे. अंतिम फेरीत कोणता संघ बाजी मारणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. आयपीएलच्या अंतिम फेरीत विजयी होणाऱ्या संघाला ट्रॉफीसह कोट्यवधी रुपये मिळणार आहेत.

आयपीएल २०२४ च्या विजेत्या संघाला बक्षीस म्हणून मोठी रक्कम मिळेल. मिळालेल्या माहितीनुसार जेतेपद पटकावणाऱ्या संघाला २० कोटी रुपये बक्षीस म्हणून मिळणार आहेत. तर उपविजेता संघाला १३ कोटी रुपये मिळणार आहेत. त्याचबरोबर तिसऱ्या स्थानी राहिलेल्या राजस्थान रॉयल्स संघाला ७ कोटी आणि चौथ्या स्थानावर राहिलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुला ६.५ कोटी मिळणार आहेत.

आयपीएलमधील विजेत्या आणि उपविजेत्या संघांना मिळालेल्या बक्षीस रकमेशिवाय इतरही अनेक पुरस्कार दिले जातात. तसेच अन्य बक्षीस देण्यात येणार आहेत.

# अंबती रायडूची विराट कोहलीवर टीका

**अहमदाबाद** : आयपीएलची ट्रॉफी आक्रमकपणा आणि विजयाच्या जल्लोषाने जिंकता येत नसते, तसेच चेन्नईला हरवले म्हणून आयपीएल विजेता होता येत नाही, त्यासाठी प्ले-ऑफमध्ये चांगला खेळ करावा लागतो, अशा तिखट शब्दांत अंबाती रायडूने अप्रत्यक्षपणे विराट कोहलीला सुनावले. गेल्या शनिवारी बंगळूर संघाकडून झालेला पराभव आणि त्यानंतर विराट कोहलीचे अतिउत्साहातील सेलिब्रेशन रायडूला पचनी पडले नव्हते.

J.S.M. College, Alibag
www.jsmalibag.edu.in
(Affiliated to University of Mumbai)
* Most Emerging Higher Education Institute of the Year
* Best College Award from the University of Mumbai

ADMISSIONS OPEN
For the Academic Year 2024-25

DEGREE COURSES
B.A. :- Marathi, Hindi, English, Economics, Politics, Geography
B.Sc. :- Chemistry, Physics, Botany
B.Com.

EXCLUSIVELY AT J.S.M.
B.Sc. :- Computer Science
B.Sc. :- Information Technology
B.M.S. :- Bachelor of Management Studies

DIPLOMA & CERTIFICATE COURSES
DMLT :- Diploma in Medical Laboratory Technology
GST Taxation :- Certificate Course
B.Sc. :- MLT (Medical Laboratory Technology)
B.Sc. :- Optometry

POST GRADUATE COURSES
M. A. :- Marathi, Hindi M. Com. :- Accountancy
M. Sc. :- Chemistry, Botany

CONTACT : 7721813636 / 7085529076
Dr. Sonali Patil, Principal, J. S. M. College
Adv. Gautam Patil, President, Janata Shikshan Mandal

# कंपाऊंड तिरंदाजी स्पर्धेत भारतीय महिलांचा डंका!

## फायनलमध्ये तुर्कीचा पराभव, सुवर्णपदकावर कोरले नाव

। दक्षिण कोरीया । वृत्तसंस्था ।

सध्या दक्षिण कोरियामध्ये तिरंदाजी विश्वचषकाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रनीत कौर, अदिती स्वामी आणि ज्योती सुरेखा वेन्नम या भारतीय महिला संघाने शनिवारी (२५ मे) या स्पर्धेच्या कंपाउंड स्टेज दोनच्या अंतिम फेरीत तुर्कीचा पराभव करून सलग तिसरे सुवर्णपदक जिंकले.

भारतीय त्रिकुटाने तुर्कीच्या हजल बुरुन, आयसे बेरा सुझर आणि बेगम युवा यांचे आव्हान सुरुवातीपासूनच मोडून काढले आणि अंतिम सामना २३२-२२६ असा जिंकला. सध्या जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या प्रनीत कौर, अदिती स्वामी आणि ज्योती सुरेखा वेन्नम यांनी तुर्कीचे आव्हान मोडून काढले आणि एकही संधी न दवडता सुवर्णपदक जिंकले.



अंतिम फेरीची सुरुवात खूपच रोमांचक झाली. तिरंदाजी विश्वचषकातील भारतीय त्रिकुटाचे हे तिसरे सुवर्णपदक आहे. सध्या सुरू असलेल्या विश्वचषकात भारताला आणखी दोन पदकांची आशा आहे.
ज्योती सुरेखा वेण्णम आणि प्रियांश यांचा अमेरिकेतील त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांशी कंपाऊंड मिश्र सांघिक अंतिम फेरीत सामना होईल, तर प्रथमेश फुगेला कंपाउंड प्रकारात पदक जिंकण्यासाठी आणखी एका विजयाची गरज आहे. अशा स्थितीत भारताला आणखी दोन सुवर्णपदके जिंकण्याची संधी आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)